POSTAL REGISTRATION : PLG/255/2023-2025

RNI NO:- MAHMAR/2021/81614

मराठी दैनिक

# मराठी एकीकरण बातमीपत्र

मराठी मायबोलीचा अभिमान जोपासणारे एकमेव पत्र

○संपादक : डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक

○उप संपादिका : .सौ. प्रीती दिपक नाईक ○कार्यकरी संपादक : श्री. विनोद दशरथ मेढे

● वर्ष -०५ ● अंक-१३२ ● मुंबई, रविवार, १४ डिसेंबर २०२५ ● पृष्ठ-८ ● मूल्य-५ रु.

MARATHI EKIKARAN BATMIPATRA

## महाराष्ट्राला हादरवणारा घोटाळा, लाडकी बहिण योजनेच्या १६५ कोटींवर डल्ला

**■ बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक,**

राज्यातील महिलांना आर्थिक आधार देण्यासाठी सुरू करण्यात आलेल्या महत्त्वाकांक्षी लाडकी बहिण योजनेत मोठा घोटाळा झाल्याची धक्कादायक बाब समोर आली आहे. महिला व बालविकास मंत्री अदिती तटकरे यांनी लाडकी बहीण योजनेत तब्बल १६५ कोटी रुपयांचा घोटाळा झाल्याची कबुली विधिमंडळात एका लेखी प्रश्नाच्या उत्तरादरम्यान दिली. त्यामुळे राज्यात खळबळ उडाली आहे.

महाराष्ट्रात सरकारने विधानसभा निवडणुकीपूर्वी लाडकी बहीण योजना सुरु केली होती. लाडकी बहीण या योजनेअंतर्गत सुमारे ११ कोटी ४२ लाख ६७ हजार ४२३ महिलांना लाभ दिला गेला होता. परंतु, यातील १ लाख ३९ हजार ९५८ लाभार्थी नियमांचे उल्लंघन करून अपात्र ठरले. यामध्ये पुरुष, सामान्य अपात्र महिला आणि खुद्द शासकीय महिला कर्मचारी यांचा समावेश आहे. या प्रकरणातील दोषी अधिकारी-कर्मचाऱ्यांकडून वसुली करून त्यांच्यावर फौजदारी कारवाई केली जाणार असल्याचे सरकारने स्पष्ट केले आहे.

### अदिती तटकरे काय म्हणाल्या ?

महिला व बालविकास मंत्री अदिती तटकरे यांनी दिलेल्या माहितीनुसार, लाडकी बहीण योजनेत तब्बल १ लाख ३९ हजार ९५८ अपात्र व्यक्तींनी गैरलाभ घेतला आहे. यातील १२ हजार ४३१ पुरुषांनी नियमांचे उल्लंघन करत सुमारे २५ कोटी रुपये लाटले. तसेच, उत्पन्नाची किंवा इतर निकषांची पूर्तता न करणाऱ्या ७७ हजार ९५८ अपात्र महिलांनी योजनेतून १४० कोटी रुपयांचा गैरलाभ घेतला. याव्यतिरिक्त, ९ हजार ५२६ शासकीय महिला कर्मचाऱ्यांनी अपात्र असतानाही १४.५० कोटी रुपये लाटले. या घोटाळ्याची एकूण रक्कम १६५ कोटी रुपये नमूद केली आहे.

शासनाने आता या सर्व अपात्र लाभार्थ्यांकडून विशेषतः सरकारी कर्मचाऱ्यांकडून या निधीची वसुली करण्याचे आणि त्यांच्यावर रितसर कायदेशीर कारवाई करण्याचे आदेश दिले आहेत. या योजनेच्या निकषानुसार, १८ वर्षांवरील महिलांनाच लाभ मिळतो. तरीही, १२ हजारांहून अधिक पुरुषांनी या योजनेचा लाभ घेतला आहे. तर ९,५०० हून अधिक महिला सरकारी कर्मचाऱ्यांनी त्यांच्या उत्पन्नाची मयार्दा किंवा इतर नियम डावलून या योजनेचा गैरलाभ घेतल्याचे उघड झाले आहे.




### कारवाई काय?

याबद्दल मंत्री अदिती तटकरे यांनी स्पष्ट केले की, हा गंभीर गैरव्यवहार असून, शासनाने यावर तातडीने कठोर कारवाई करण्याचे निर्देश दिले आहेत. ज्या शासकीय अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी अपात्र असतानाही योजनेचा लाभ घेतला आहे, त्यांच्याकडून लाटलेल्या पैशांची वसुली करण्यात येईल. तसेच, नियमांनुसार त्यांच्यावर रितसर कायदेशीर आणि फौजदारी कारवाई केली जाईल. तसेच अपात्र पुरुष लाभार्थ्यांवरही नियमांनुसार कारवाई केली जाईल.




### महापालिकेचे स्पष्टीकरण

एनएमसी ने सांगितले की, केवळ १० वर्षाखालील लहान झाडे आणि बुशेस तोडले जातील, तर ४० ते १०० वर्षे जुने वारसा झाडे (जसे बरगड, पिंपळ) जपले जातील. प्रत्येक तोडलेल्या झाडासाठी १० रोपे लावली जातील, आणि काही झाडे आंध्र प्रदेशातील तज्ञांच्या मदतीने इतरत्र रोवली जातील. साधूग्राम १२०० एकरांपर्यंत विस्तारणार असल्याने ही गरज असल्याचे सांगितले.

### हरित लवादाची भूमिका

सर्वोच्च न्यायालयाचे कायदेतज्ञ श्रीराम पिंगळे यांनी वृक्षकटाईला स्थगित करण्यासाठी राष्ट्रीय हरित न्यायाधिकरणात (एनजीटी) याचिका दाखल केली. लवादाने तत्काळ दखल घेतली आणि नाशिक महापालिकेला एकही झाड तोडू नये असे आदेश दिले. याशिवाय, वृक्षकटाईबाबत तपशीलवार अहवाल सादर करण्याचे निर्देशही दिले. नाशिकमधील तपोवन परिसरातील वृक्ष तोडीला स्थगित बाबतच्या आदेशाची हरित लवादाने या प्रकरणी नाशिक महापालिकेला आदेश दिला. या परिसरातील एकही वृक्ष तोडू नये, त्याच बरोबर वृक्षतोडी बाबतचा अहवाल तत्काळ सादर करण्याचे आदेश दिले आहेत.

## तपोवन वृक्षतोडीसंदर्भात सर्वात मोठी अपडेट
## रित लवादाकडून नाशिक पालिकेला जोरदार दणका!

**■नाशिक। प्रतिनिधी,**

नाशिकमधील तपोवन हा गोदावरी नदीकाठचा हिरवा पट्टा आहे, जो धार्मिक आणि पर्यावरणीयदृष्ट्या महत्त्वाचा आहे. २०२६-२७ सिम्हस्थ कुंभमेळ्यासाठी साधूग्राम संतांसाठी तात्पुरते निवासस्थान बांधण्यासाठी नाशिक महानगरपालिकेने १७०० हून अधिक झाडे तोडण्याची योजना आखली. यामुळे स्थानिक नागरिक आणि पर्यावरणप्रेमींमध्ये मोठा रोष निर्माण झाला, आणि चिपको आंदोलनासारखे आंदोलन उभे राहिले. याप्रकरणात आता सर्वात मोठी अपडेट समोर आली आहे.

**जनतेचा विरोध आणि शेकडो हरकती**

नागरिकांनी सोशल मीडियावर #SaveTapovan हॅशटॅगने व्हिडिओ आणि सिग्नेचर मोहीम चालवली. एनएमसी च्या नोटिसीला अवघ्या १२ दिवसांत ९०० पेक्षा जास्त हरकती मिळाल्या. ११ नोव्हेंबरला जाहीर सुनावणीत गोंधळ उडाला, जिथे कार्यकर्त्यांनी एकही झाड तोडू नये असा ठाम आग्रह केला. यात राजकीय पक्ष आणि सामान्य लोक सामील झाले.

**मंत्र्यांच्या भेटीत आश्वासन**

कुंभमेळा मंत्री गिरीश महाजन यांनी तपोवनाला भेट देऊन कार्यकर्त्यांना दिलासा दिला. प्रत्येक झाडासाठी १० रोपे लावण्याचे आश्वासन दिले, आणि गोदावरीत सतत पाणी वाहण्यासाठी प्रयत्न सुरू असल्याचे सांगितले. पाशीचा डोंगर आणि पेठ रोडवर नवीन रोपस्थळी विकसित होत असल्याची माहितीही दिली.

**पुढे काय होणार ?**

या आदेशामुळे वृक्ष छाटणीला पूर्ण स्थगिती मिळाली, आणि एनएमसी ला पर्यावरण संरक्षणाबाबत जबाबदारी वाढली. ८ डिसेंबरला कार्यकर्त्यांसोबत चर्चा झाली, ज्यात साधूग्रामसाठी पर्यायी योजना सुचवल्या गेल्या. हे प्रकरण विकास आणि हिरव्या संरक्षण यांच्यातील संतुलनावर प्रकाश टाकते, ज्यामुळे नाशिकची 'ग्रीन कुंभ' प्रतिमा मजबूत होईल.

## तपोवनातील वृक्षतोडीला १५ जानेवारीपर्यंत स्थगिती... राष्ट्रीय हरित लवादाचा अंतरिम आदेश

**■रायगड। प्रतिनिधी,**

नाशिकमधील तपोवन परिसरातील वृक्षतोडीला राष्ट्रीय हरित लवादाकडून १५ जानेवारीपर्यंत स्थगिती देण्यात आली आहे. ही स्थगिती अंतरिम आहे आणि कायदेशीर प्रक्रिया पूर्ण होईपर्यंत वृक्षतोडी थांबविण्याचा आदेश देण्यात आला आहे.

**वृक्षतोडी विरोधी याचिका आणि लवादाचा निर्णय**

वकील श्रीराम पिंगळे यांनी सांगितले की, हरित लवादामधे नाशिकमधील तपोवनातील वृक्षतोडीच्या विरोधात याचिका दाखल करण्यात आली होती. हरित लवादाने तपोवनातील वृक्षतोडीला १५ जानेवारीपर्यंत स्थगिती दिलीय. हा अंतिम आदेश नाही तर अंतरिम आदेश आहे. तपोवनातील झाडे तोडण्याआधी न्यायिक प्रक्रिया राबवायला हवी, असं आमचं मत आहे. ती न राबवताच वृक्षतोड केली जात आहे. एकदा तोडलेल्या वृक्षांचं पुनर्रोपण नीट केलं जातं नाही, हा अनुभव आहे. यावर्षी झालेल्या कुंभमेळ्यात उभारण्यात आलेल्या एक्झिबिशन सेंटरचा काहीही उपयोग झाला नाही. वृक्षतोडीला आमचा विरोध आहे, असे त्यांनी म्हटले आहे.

**साधूग्राम प्रकल्प आणि वादग्रस्त वृक्षतोडी**

दरम्यान, नाशिकमध्ये २०२७ मध्ये होणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळ्याच्या तयारीसाठी तपोवन परिसरात साधू-महंतांच्या निवासासाठी ११५० एकरांवर साधूग्राम उभारण्याची योजना आहे. या कामासाठी सुमारे १८०० झाडांची तोड प्रस्तावित होती, ज्यामुळे स्थानिक नागरिक, पर्यावरणप्रेमी आणि अनेक सेलिब्रिटींनी तीव्र विरोध नोंदवला आहे. अभिनेते सयाजी शिंदे, शिवसेना ठाकरे गटाचे प्रमुख उद्धव ठाकरे, मनसे अध्यक्ष राज ठाकरे यांनाही वृक्षतोडीविरोधात आपली भूमिका स्पष्ट केली आहे. मनसे आणि ठाकरे गटाकडून तपोवन वृक्षतोडीविरोधात स्थानिक आंदोलन छेडण्यात आले होते. तपोवनातील एकही झाड तोडू देणार नाही, असा कडक इशारा या आंदोलनातून देण्यात आलाय.

### नाशिकमध्ये १५ हजार वृक्षांची लागवड होणार

दरम्यान, तपोवन परिसरातील प्रस्तावित साधूग्राम प्रकल्पामुळे होणाऱ्या संभाव्य १८०० वृक्षतोडीबद्दल शहरात तीव्र विरोध सुरू असताना, राज्य सरकारने शहरात वृक्ष लागवड करण्याचा निर्णय घेतला आहे. याच मोहिमेअंतर्गत राजमुद्री येथून आणलेली झाडे आता टप्याटप्याने नाशिकमध्ये दाखल होऊ लागली असून पहिला ट्रक नाशिकमध्ये दाखल झाला आहे. कुंभमेळा मंत्री गिरीश महाजन यांनी काही दिवसांपूर्वीच दक्षिण भारतातील राजमुद्री येथे भेट देत झाडांची निवड केली. सुमारे १५ फूट उंचीची १५ हजार देशी झाडे वड, पिंपळ, निंब, जांभूळ, आंबा आदींचा समावेश आहे. ठिबक सिंचन प्रणालीसह जैविक खतांचा वापर करून मनपा उद्यान विभागाकडून झाडांच्या देखभालीची व्यवस्था केली जाणार आहे. सोमवारपासून गिरीश महाजनांच्या उपस्थितीत वृक्षलागवड मोहिमेला औपचारिक सुरुवात होणार आहे.

## संध्याकाळी घरातच रहा, एकट्याने बाहेर पडू नका
## नागपुरात 'या' परिसरात पिटवली जातेय दवंडी... काय आहे कारण?

### संध्याकाळी घरातच रहा, एकट्याने बाहेर पडू नका!

नागपुरात पवनगावमधील रिवानगर परिसरात बिबटची दहशत पसरल्यानंतर पवनगावच्या सरपंचांनी गावात दवंडी पिटवण्यास सुरुवात केली आहे. एवढंच नाही तर परिसरातील नागरिकांना प्रत्येक व्हाट्सअप ग्रुपवर संध्याकाळी उशिरा लोकांनी बाहेर पडू नये आणि सकाळी लवकर एकटे बाहेर निघू नये असे मेसेज पाठवले जात आहे. पोलीस पाटलांनी सुद्धा पोलीस विभागाला बिबट दिसल्याची आणि त्यामुळे रिवानगरमधील नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण असल्याची माहिती पोलीस विभागाला दिली आहे. लोकांनी काळजी घ्यावी स्वतःला सुरक्षित ठेवावं आणि अंधारात विनाकारण बाहेर पडू नये अशी सूचना गावातील प्रशासनाकडून नागरिकांना दिली जात आहे. विरळ वस्तीमध्ये राहणाऱ्या लोकांच्या घरी सरपंच स्वतः जाऊन भेट ही देत आहे.



**■मुंबई। प्रतिनिधी,**

नागपुरातील पारडी भागात बिबट्याची दहशत पसरली आहे. दोन दिवसांपूर्वी या परिसरात जवळपास ७ - ८ जणांवर बिबट्याने नागरिकांवर हल्ला केला. यात एक नागरिक गंभीर जखमी झाला असून रुग्णालयात उपचार सुरु आहे. सर्चिंग ऑपरेशनमध्ये बिबट्याला जेरबंद करण्यात आलं आहे. मात्र शहरात पुन्हा बिबट्याचा शिरकाव झाल्याची बातमी वाऱ्यासारखी पसरली आहे. १५ दिवसात दुसऱ्यांदा पारडी भागात बिबट्याचा शिरकाव झाला होता. आता पुन्हा एकदा गुरुवारी बिबट्या दिसल्याचा दावा काही जणांनी केला आहे. त्यामुळे पवनगाव परिसरातील नागरिक प्रचंड दहशतीत पसरली आहे.

**बिबट्यामुळे परिसरात भीतीदायक वातावरण!**

पारडी शिवनगर इथे बिबट्याच्या हल्ल्याच्या घटनेनंतर लगतच्या पवनगाव परिसरातील नागरिक प्रचंड दहशत पसरली आहे. गुरुवारी दुपारी पवनगाव लगतच्या परिसरात बिबट दिसल्याचा दावा काही जणांनी केल्यानंतर परिसरातील नागरिक बिबट हल्ल्याच्या सावटाखाली धास्तीत आहे. संध्याकाळ ६ नंतर सर्व नागरिक घराचे दार बंद करून आत बसले होते. लहानग्यांना तर सुरक्षेच्या दृष्टीने घराच्या बाहेर सोडण्यास कोणी धजावत नव्हत. एरवी घराच्या बाहेर रात्री आठ नऊ वाजेपर्यंत फिरणारे आणि रात्रीची शतपावली घेणारे ही संध्याकाळी सहानंतर घराच्या बाहेर पडले नव्हते. परिसरात एक संध्याकाळी ६ नंतर सुन्नसान वातावरण होतं.

रीवानगरमध्ये रहिवासी असलेल्या ठाकूर कुटुंबातील एका चिमुकलेने दुपारी बिबटला घरा लगतच्या शेतात फिरताना पाहिल्याचा दावा केला. त्यानंतर स्थानिकांनी प्रशासनाला याबाबत माहिती दिली होती. महत्त्वाचं म्हणजे हे ठाकूर कुटुंब बिबट वावर असल्याच्या भीतीने घराची दार बंद करून बसले होते. आजूबाजूचे नागरिकही बिबट दिसल्याच्या चर्चा नंतर भीती बाळगून आहे. मुलांना घराबाहेर कसे सोडायचे, शाळेत कसे पाठवायचे या विवंचनेत इथले नागरिक आहेत. तर काहीजण तर कुटुंबीयांना बाहेर दुसऱ्या ठिकाणी पाठवण्याच्या तयारीत आहे.

## लेकरांना विकलं नाही तर, दत्तक दिलेत...
## पतीने १०० रुपयाच्या स्टॅम्प पेपरवर मुलीला दत्तक दिल्याचं उघडकीस

**■मुंबई। प्रतिनिधी,**

त्र्यंबकेश्वर तालुक्यातील टाके देवगाव येथील बरड्याची वाडी वावीहर्ष पाड्यावर राहणाऱ्या ४५ वर्षीय महिलेने तब्बल १४ मुलं मुलींना जन्म दिला. या महिलेने मुलांचे संगोपन होत नाही आर्थिक अडचण आणि मुलांना आजारपणात योग्य उपचार मिळत नाही यामुळे १४ मुला मुलींपैकी सहा मुलं आणि मुली विकल्याचा संशय स्थानिक सामाजिक कार्यकत्यार्ने उपस्थित केला.


या घटनेने एकाच खळबळ उडाली असून पैशांसाठी पोटच्या मुलाला विकल्याचा संशय व्यक्त झाल्याने यंत्रणादेखील खडबडून जागी झाली. आता या प्रकरणात आणखी एक धक्कादायक माहिती समोर आली आहे.

**नेमकं प्रकरण काय ?**

नाशिकच्या त्र्यंबकेश्वर येथील टाके देवगाव या आदिवासी बहुल पाड्यात वावी हर्ष येथे एक धक्कादायक प्रकार समोर आला. 45 वर्षीय बच्चुबाई हंडोगे यांना तब्बल 14 मुले झाली आहेत. या पैकी सहा पेक्षा जास्त मुली आणि मुले पैशासाठी विकल्याचा संशय स्थानिक सामाजिक कार्यकर्त्यांनी व्यक्त केला आहे. १० ऑक्टोबर २०२५ रोजी या महिलेला एक मुलगा झाला. नवजात बाळाचे वजन कमी असल्यामुळे आरोग्य विभागाच्या आशा कर्मचाऱ्यांमार्फत त्याची घरपोच आरोग्य तपासणी सुरू होती. मात्र, महिलेने मुलाचे संगोपन केले नसल्याने बाळ विकल्याची माहिती आशा कर्मचाऱ्यांना तसेच स्थानिक सामाजिक कार्यकर्त्यांना मिळाली.

जेव्हा स्थानिक आशा सेविकांनी बाळाची आरोग्य तपासणी करण्यासाठी घरात भेट दिली, तेव्हा महिलेने नवजात बाळ विकल्याचे सूचित केले. याआधीदेखील दोन ते तीन लहान मुले विकल्याची माहिती मिळाल्याचे संशय उपस्थित केला गेला. आमच्या टीमने या आदिवासी पाड्यावर पोहोचून संपूर्ण प्रकार जाणून घेतला, आणि हा प्रकार नेमका काय आहे हे स्थानिक आशा सेविकेकडूनच समजले.

आरोग्य तपासणीसाठी बाळ कुठे आहे, असा प्रश्न विचारल्यावर महिलेने आशा सेविकेला बाळ देऊन टाकल्याचे सांगितले. याआधीही अशा प्रकारच्या दोन ते तीन घटना घडल्यामुळे आशा सेविकांचा संशय वाढला आणि त्यांनी वरिष्ठ अधिकाऱ्यांना प्रकरणाची माहिती दिली. डॉक्टरांकडून ही माहिती मिळताच घटनेची सखोल चौकशी सुरू करण्यात आली. घडलेल्या घटनेमुळे स्थानिक सामाजिक कार्यकर्त्यांनाही माहिती मिळाली. महिलेने कोणतीही मदत मिळवली नव्हती आणि आर्थिक अडचणींमुळे बाळाचे संगोपन शक्य नव्हते. सामाजिक कार्यकर्त्यांच्या म्हणण्यानुसार, आरोग्य विभागाच्या अकार्यक्षमतेमुळे जन्मदात्या आईनेच नवजात बाळ विकल्याचा संशय व्यक्त केला जात आहे. मात्र आता या प्रकरणाला वेगळे वळण लागले आहे.




### लेकरांना विकलं नाही तर...

बच्चीबाई हाडोंगे याच महिलेने आणि तिच्या पतीने १०० रुपयाच्या स्टॅम्प पेपरवर मुलीला दत्तक दिल्याचे उघडकीस झाले आहे. अंगणवाडी सेविकांनी दत्तक पत्राच्या आधारे जन्म दाखला बनविल्याचा सामाजिक कार्यकत्यार्चा आरोप आहे. या सर्व प्रकरणाची आता चौकशी होणार आहे. महिला बालविकास विभागाच्या चौकशी समितीत काय समोर येते? याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे.

## बुलढाण्यात वाळू माफियांवर पोलिसांची धडक कारवाई
## सात बोटींसह ९० लाखांचा मुद्देमाल जप्त



### मोफत रेती योजनेचाही फज्जा

शासनाने जाहीर केलेल्या मोफत रेती योजनेचा उद्देश म्हणजे आर्थिकदृष्ट्या दुर्बळ नागरिकांना घरबांधणीसाठी मदत मिळावी. पण इथे ही योजना दलाल आणि माफियांकडून हडप केली जात असल्याचा आरोप होत आहे. मोफत रेतीचे नियमानुसार वितरण न होता तीच रेती नागरिकांना पैसे मोजून खरेदी करावी लागत आहे. काही ठिकाणी तर यासाठी हप्ते पद्धतीनेही पैसे घेतले जात असल्याचे सांगण्यात येत आहे.

**■रायगड। प्रतिनिधी,**

महसूल प्रशासनाच्या नाकावर टिच्चुन पोलिसांनी बुलढाणा जिल्ह्यातील वाळू माफियांवर धडक कारवाई केली. खडकपूर्णा धरण क्षेत्रात स्थानिक गुन्हे शाखेने ही कारवाई केली आहे. वाळू उपसा करणाऱ्या सात बोटींसह ९० लाखांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. गेल्या काही दिवसापासून खडकपूर्णा धरण क्षेत्रात मोठ्या प्रमामात अवैधरित्या वाळू उपसा सुरु आहे. पोलिसांनी या घटनेची गंभीर दखल घेत आज कारवाई केली आहे.

**खडकपूर्णा धरण क्षेत्रात मोठ्या प्रमाणात अवैधपणे वाळूचा उपसा**

खडकपूर्णा धरण क्षेत्रात मोठ्या प्रमाणात अवैधपणे वाळूचा उपसा होत असल्याच्या अनेक तक्रारी दिवसेंदिवस वाढत होत्या. परिसरातील नागरिकांनी अवैध रेती उपसा संदर्भात ३०० च्या वर तक्रारी करूनही महसूल प्रशासनाने याची दखल घेतली नाही. मात्र पोलीस अधीक्षकांना तक्रार प्राप्त होताच याची दखल पोलीस अधीक्षक निलेश तांबे यांनी घेत कालपासून खडकपूर्णा धरण क्षेत्रातील अवैध वाळू माफियांवर स्थानिक गुन्हे शाखेच्या मदतीने कारवाई केली आहे.

अलीकडच्या काळात ही सर्वात मोठी कारवाई असून जवळपास सात वाळू उपसा करणाऱ्या बोटीनसह ९० लाखांचा मुद्देमाल जप्त केला आहे. खरं तर ही कारवाई महसूल प्रशासनाने करणे अपेक्षित असताना पोलिसांनी स्थानिक गुन्हे शाखेच्या मदतीने ही कारवाई केल्याने जिल्ह्यात खळबळ उडाली आहे.

**दिवस-रात्र रेती वाहतूक सुरु असल्याने रेती माफियांचे बळकट**

अनेक ठिकाणी अवैध रेती वाहतूक सुरु आहे. दिवस-रात्र रेती वाहतूक सुरु असल्याने रेती माफियांचे बळकट जाळे तयार झाले आहे. याविरोधात महसूल विभाग कारवाई करत आहे. मात्र, कारवाई केल्यानंतरही अवैध वाहतूक सुरुच असल्याचे चित्र दिसून येत आहे. अवैध रेती वाहतूक करताना महसूल विभागाच्या अधिकाऱ्यांवर देखील जीवघेणे हल्ले करण्याच्या घटना घडत आहेत. या हल्ल्यांमध्ये तलाठी, मंडळ अधिकारी आणि निवासी जिल्हाधिकाऱ्यांवरही प्राणघातक हल्ले झाल्याचे समोर आले आहे.

## गोरेगावमध्ये भटक्या कुत्र्यांच्या टोळीने तोडले महिलांच्या लचके

**■मुंबई। प्रतिनिधी,**

भटक्या कुत्र्यांच्या टोळीने महिलांच्या गालांचे लचके तोडल्याची धक्कादायक घटना मुंबईतील गोरेगावमध्ये घडली आहे. गोरेगावच्या पश्चिमेकडील भागात ही घटना घडली आहे. या प्रकारामुळे स्थानिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. पहाटे तसेच रात्री उशिरा रस्त्यावर वावरण्यास नागरिक घाबरत आहेत. कुत्रे टोळक्याने येऊन हल्ला करतात त्यामुळे बचावाची संधीच मिळत नाही, असे स्थानिकांनी सांगितले. मागील काही दिवसांपासून परिसरातील भटक्या कुत्र्यांची संख्या वाढली आहे. शाळा, वसाहती, बाजारपेठांच्या रस्त्यांवर भटक्या कुत्र्यांची टोळकी बिनबोभाट वावरताना दिसू लागली आहे. श्वानप्रेमी सार्वजनिक ठिकाणी कुत्र्यांना दूध बिस्किटांपासून ते चिकन मटणापर्यंत खाऊ घालत आहेत. यामुळेच गोरेगावमध्ये कुत्र्यांची संख्या वाढत आहे. दररोज गोरेगावच्या वेगवेगळ्या भागांतून कुत्रे चावल्याच्या तक्रारी येऊ लागल्या आहेत. या तक्रारी वाढू लागल्यामुळे प्रशासनाच्या चिंतेत भर पडली आहे.



## संपादकीय

संपादक
दिपक मोरेश्वर नाईक

# प्रवासी ठकले!




दहा दिवस झाले, तरी देशात हवाई प्रवास क्षेत्रात झालेला घोळ संपायची चिन्हं दिसत नाहीत. 'आता निदान पंधरा दिवसांत तरी हा घोळ निस्तरा' असं काकुळतीने सांगण्याची वेळ केंद्र सरकारवरच आली आहे! 'इंडिगो' ही आज देशातील अग्रगण्य विमान कंपनी आहे. देशाच्या विमान वाहतूक क्षेत्राचा ६५ टक्के वाटा या कंपनीकडे आहे. टाटांकडे २७ टक्के वाटा आहे. उरलेल्या टक्क्यात अन्य तीन-चार कंपन्या आहेत. 'इंडिगो'ने आपल्या व्यवहार कुशलतेने हवाई वाहतूक क्षेत्रावर मक्तेदारी मिळवली हे ठीक; पण एवढं महत्त्वाचं स्थान मिळाल्यावर त्याबरोबर काही कर्तव्य आणि जबाबदाऱ्याही येतात याची जाणीव त्या कंपनीला नाही. जेव्हा देशाच्या एखाद्या क्षेत्राच्या ६५ टक्के वाट्यावर आपण अधिराज्य गाजवतो, तेव्हा एका अथार्ने देशातल्या त्या क्षेत्राची सर्वाधिक जबाबदारी आपल्या खांद्यावर आलेली असते; कर्तव्यात चुकलो, तर त्या देशाची प्रतिमा खराब होतेच. पण, ज्यांनी आपल्याला मुक्त संधी आणि प्रोत्साहन दिलं, त्यांनाही आपण जनतेसमोर उघडं पाडतो याचा विसर 'इंडिगो'च्या व्यवस्थापनाला पडलेला दिसतो. अनेक क्षेत्र सरकारने खासगी उद्योगांना मुक्त करून दिली असून त्यांचे व्यवहार हे आता पूर्णपणे 'बाजारा'वर; म्हणजेच स्पर्धेवर सोडून दिले आहेत. खासगी उद्योगांचं सेवा व्यवस्थापन, वित्त व्यवस्थापन, कर्मचाऱ्यांबाबतचं धोरण यात सरकार फार हस्तक्षेप करू शकत नाही. त्यामुळेच 'इंडिगो'ने लाखो प्रवाशांचं जगणं वेठीला धरूनही सरकार त्यांच्यावर अद्याप काही कारवाई करू शकलेलं नाही. वाहतूक क्षेत्राची नियामक संस्था म्हणून देशात 'नागरी विमान वाहतूक महासंचालनालय' आहे. पण, हे महासंचालनालयच बेसावध राहिल्याने हा अभूतपूर्व गोंधळ निर्माण झाला असून आता कारवाई करायची तर आधी कोणावर करावी, असा प्रश्न सरकारला पडला आहे. 'इंडिगो'ने बेजबाबदारपणा केला आहेच. पण, विमान वाहतूक क्षेत्रातल्या कंपन्या आपल्या जबाबदाऱ्या नीट पार पाडताहेत की नाही, याची खातरजमा करण्यासाठी जी नियामक यंत्रणा आहे, तिनेच डोळेझाक केली असल्याने सरकारची पंचाईत झाली आहे. झालेला घोळ लवकर निस्तरला नाही आणि त्यातून राष्ट्रीय संपत्तीचं नुकसान झालं, या आरोपाखाली पंधरा दिवसांनंतर सरकारला कदाचित कारवाई करता येईल! कोणतंही वाहन संकेत आणि नियम न पाळता चालवणं धोक्याचंच असतं. विमान विशेष धोक्याचं. कारण, ते अधांतरी तीस-पस्तीस हजार फुटांवरून उडत असतं. अगदी शे-दोनशे फुटांवर त्यात काही अडचण, संकट आलं तरी मदत करता येणं अशक्य असतं. त्यामुळे, विमानाची देखभाल नेहमीच खूप काटेकोरपणे केली जाते. वैमानिकाचं प्रशिक्षण खूप खडतर असतं. त्यांना नियमांचं, मार्गदर्शक सूचनांचं खूप काळजीपूर्वक पालन करावं लागतं. आपली बौद्धिक, मानसिक आणि शारीरिक तंदुरुस्ती सतत सिद्ध करावी लागते. विमान कंपनीसाठी, कंपनीच्या व्यवस्थापनासाठी, वाहतूक व्यवस्थापनासाठी- राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय अशा दोन्ही पातळ्यांवर असंख्य तपशीलवार कडक नियम आहेत. त्यांची छाननी, फेरआखणी सातत्याने होत असते. विमान प्रवास करणाऱ्या प्रवाशांमध्ये आता मध्यमवगीर्यांची संख्या वाढली असली, तरी आजही विमान प्रवाशांची प्रतिष्ठा ही अन्य कोणत्याही साधनांनी प्रवास करणाऱ्या प्रवाशांपेक्षा उच्च श्रेणीतलीच मानली जाते. त्यामुळे, जगभर त्यांची विशेष काळजी घेतली जाते. वैमानिक, हवाई सेवक आणि सेविकांच्या प्रशिक्षणाकडे, त्यांच्या वर्तणुकीकडे, मिळकतीकडे विशेष लक्ष दिलं जातं. भारतात गेल्या पंधरा वर्षांत तीन मोठे विमान अपघात झाले. त्यात शेकडो बळी गेले. यातल्या एका अपघातात 'वैमानिकाचा थकवा' हे कारण पुढे आल्यानंतर दिल्ली उच्च न्यायालयात एक याचिका दाखल झाली. त्या याचिकेवर विचार करताना न्यायालयाने महासंचालनालयाला काही निर्देश दिले. त्यावरून वैमानिकांच्या विश्रांतीचे तास आठवड्याला ३६ वरून सलग ४८ केले गेले. रात्रपाळीच्या, दिवसाच्या कामाच्या तासांतही बदल झाले. या सगळ्या गोष्टींची अंमलबजावणी अनिवार्य होती. सरकारचे नवे नियम अमलात आणायचे, तर वैमानिकांची संख्या वाढवावी लागणार, हे उघड होतं. १८ महिन्यांपूर्वीच याबाबतची स्पष्टता येऊनही 'इंडिगो' गेलं दीड वर्ष काहीही न करता तशीच बसून राहिली. सरकारची कुठलीच गोष्ट गंभीरपणे घ्यायची नसते, या गैरसमजाचे ती शिकार झाली. 'सब चल जाता है' या राष्ट्रीय रोगाने तिचा घात केला. त्याची शिक्षा लाखो प्रवाशांना भोगावी लागली. सरकारला आरोपीच्या पिंजऱ्यात उभं राहावं लागलं. 'इंडिगो' पाठोपाठ देशात या क्षेत्रात दुसऱ्या क्रमांकावर 'टाटां'ची 'एअर इंडिया' आहे. त्यांच्याकडे बरीच जुनी विमान असल्याने अनेक जायबंदी आहेत. अनेक विमानं दुरुस्ती-देखभालीसाठी जमिनीवरच उभी असतात. अन्य कंपन्या छोट्या असल्याने त्यांना आहेत त्या वैमानिकांमध्ये विमान सेवा चालवणं शक्य झालं. 'इंडिगो'ला ते शक्य नव्हतं. पण, आपली मक्तेदारी इतकी आहे, की आपलं कोण काय बिघडवणार? देशात गोंधळ उडाला, तर सरकारच अडचणीत येईल. ते आपोआप आपलेच नियम शिथिल करेल, याची खात्री त्यांना होती. झालंही तसंच. देशभर हाहाकार उडूनही या कंपनीच्या व्यवस्थापनाने सुरुवातीचे दोन-तीन दिवस त्याची अजिबात दखल घेतली नाही. प्रवाशांना ढिम्मपणे उलट उत्तरं देत होते. वर वाढत्या तिकीट दरांचा फायदा उपटण्याचा प्रयत्न ही केला. सरकारने कान पकडेपर्यंत कंपनी पूर्ण बेफिकीर होती. आता ते कितीही आश्वासनं देत असले, तरीही त्या मुदतीत त्यांना परिस्थिती नियंत्रणात आणणं शक्य नाही. वैमानकांची भरती ही इतकी सहज प्रक्रिया नसते. सरकारने माघार घेतलीच आहे. यावरून धडा घेऊन सरकारनेच आता आपल्या एकूण हवाई प्रवासी धोरणाचा पुनर्विचार करण्याची गरज आहे. प्रवाशांचे हक्क त्यात केंद्रस्थानी असतील, असं पाहिलं तर या पुढच्या काळात असे घोळ होणार नाहीत आणि ते अपराधी भावाने निस्तरावेही लागणार नाहीत.

# विकासाचे महामार्ग...



**देशात रस्ते विकासाला गती देण्यात आली आहे. एकाच दिवशी जास्त किलोमीटर रस्त्याचे काम करण्याचा विक्रम नोंदवला गेला आहे. आता तर एक लाख दहा हजार कोटी रुपये खर्चून अनेक महत्त्वाचे रस्ते तयार केले जात आहेत. त्यात सरकारी-खासगी भागीदारीतून केलेल्या रस्त्यांचाही समावेश आहे. चांगले रस्ते गतिमान विकासाचे चिन्ह असून सरकारने रस्ते विकासाचा महामार्ग तयार केला आहे, त्यानिमित्ताने.**

भारतात गेल्या दहा वर्षांमध्ये केंद्र शासनाच्या समग्र आणि एकात्मिक दृष्टिकोनामुळे पायाभूत सुविधांचा अभूतपूर्व विकास झाला आहे. धोरणांमध्ये सुधारणा व युद्धपातळीवर राबविले जाणारे प्रकल्प यांच्या भक्कम पायाभरणीवर आधारित या परिवर्तनामुळे दळणवळण सुविधांचा विस्तार तर झालाच; शिवाय आर्थिक उत्पादकता वाढली. मालवाहतूक आणि साठवणुकीचा खर्च कमी झाला आणि पुरवठा सेवाही सुधारली. प्रगती, पीएम गतीशक्ती, राष्ट्रीय लॉजिस्टिक्स धोरण, भारतमाला, सागरमाला आणि उडान अशा प्रमुख राष्ट्रीय प्रकल्पांनी एकत्रितरीत्या संपर्क सुलभतेमुळे भारत जागतिक स्पधेर्ला तयार झाला आहे. २०४७ पर्यंत विकसित भारत घडवण्याच्या उद्दिष्टाला अनुसरूनच हे रूपांतरण घडते आहे. 'प्रगती' उपक्रमांतर्गत आतापर्यंत ३६३ प्रकल्पांचा आढावा घेण्यात आला. प्रगती उपक्रमाद्वारे पंतप्रधान केंद्र सरकारचे सचिव, राज्यांचे मुख्य सचिव यांच्यासोबत दूरदृश्य प्रणालीद्वारे संवाद साधतात. यामध्ये अत्याधुनिक डिजिटल डाटा व्यवस्थापन आणि भूस्थानिक तंत्रज्ञानाची मदत होते. पायाभूत सुविधा प्रकल्पांमध्ये सक्रिय प्रशासन आणि वेळेत अंमलबजावणीची संस्कृती रुजवणे हा या प्रकल्पाचा मुख्य उद्देश आहे. नागरिकांच्या तक्रारींची वेळोवेळी दखल घेऊन सरकारी योजनांच्या परिणामकारक अंमलबजावणीद्वारे हमी आणि निरनिराळ्या आंतर मंत्रालयीन किंवा संघराज्यीय समस्यांमुळे आधी रखडलेले महत्त्वाचे प्रकल्प पूर्ण करण्यासाठी कामकाजाची गती वाढवणे याद्वारे उद्दिष्ट साध्य करण्यात येत आहे.

भारताच्या आर्थिक क्षेत्रांमधील बहुआयामी वाहतूक व्यवस्था सुधारण्यासाठी 'पीएम गतीशक्ती' राष्ट्रीय बृहद् आराखडा उपक्रम १३ ऑक्टोबर २०२१ रोजी सुरू करण्यात आला. या सर्वसमावेशक उपक्रमाद्वारे शंभर कोटी रुपयांचा निधी कार्यक्षमरीत्या वापरला जात आहे. रेल्वे, रस्ते, बंदरे, जलमार्ग, विमानतळ, अवजड वाहतूक आणि लॉजिस्टिक्ससंबंधी पायाभूत सुविधा या सात महत्त्वाच्या क्षेत्रांवर आधारित हा उपक्रम मंत्रालये व राज्य सरकारांच्या माध्यमातून विकासाला चालना देत आहे. 'बिसाग-एन' (भास्कराचार्य अंतरिक्ष उपयोजन व भूमाहितीशास्त्र संस्था) संस्थेने विकसित केलेल्या जीआयएस प्रणालीचा उपयोग करून २०० डेटा मंचांवर प्रकल्पाचा वस्तुस्थिती निदर्शक नकाशा व समग्र माहिती या आराखड्याद्वारे उपलब्ध करून दिली जाते. 'पीएम गतीशक्ती' उपक्रमाच्या तत्त्वांनुसार विविध मंत्रालयांच्या १५.३९ लाख कोटी रुपये खर्चाच्या २०८ मोठ्या पायाभूत सुविधा प्रकल्पांचे मूल्यांकन केले गेले आहे. प्रकल्पांशी संबंधित विविध घटकांना प्रकल्पाची वेळेत माहिती मिळाल्यामुळे आत्मनिर्भर भारताचे उद्दिष्ट साध्य करण्यातही पीएम गतीशक्ती प्रकल्पाची मदत होईल. प्रकल्पाचे वेगवेगळ्या ठिकाणी निरनिराळ्या दृष्टिकोनातून आरेखन आणि नियोजन होण्याऐवजी आता एका समान दृष्टिकोनातून आरेखन आणि अंमलबजावणी होईल. विविध मंत्रालये आणि राज्य सरकारांच्या भारतमाला, सागरमाला, जलमार्ग, बंदरे, उडान यांसारख्या पायाभूत सुविधा योजना यामुळे एकत्रित होतील.

वस्त्रोद्योग, औषधनिर्माण, संरक्षण उत्पादन, इलेक्ट्रॉनिक्स, औद्योगिक, मत्स्य व्यवसाय, कृषी इत्यादी आर्थिक क्षेत्रांमधली दळणवळणाची सुविधा सुधारल्यामुळे भारतीय उद्योग जागतिक स्पधेर्चा सामना करण्यास सज्ज असतील. यामुळे देशाच्या आर्थिक विकासाला चालना मिळेल. विदेशी गुंतवणूक वाढेल आणि जगातले भारताचे स्थान उंचावेल. राष्ट्रीय लॉजिस्टिक्स धोरण एकात्मिक, कार्यक्षम आणि वाजवी खर्चाच्या लॉजिस्टिक सुविधांचे जाळे निर्माण करून भारताच्या आर्थिक विकासाला चालना देण्यासाठी १७ सप्टेंबर २०२२ रोजी राष्ट्रीय लॉजिस्टिक्स धोरणाची अंमलबजावणी सुरू झाली. लॉजिस्टिक्सवरील खर्च कमी करणे, २०३० पर्यंत लॉजिस्टिक्स कार्यक्षमता निदेर्शांका(एलपीआय)मध्ये जगातील पहिल्या २५ देशांमध्ये स्थान मिळवणे आणि माहिती आधारित निर्णयांना प्रोत्साहन देण्याचा या धोरणाचा उद्देश आहे. लॉजिस्टिक्सवरील सध्याचा १३-१४ टक्के खर्च कमी करुन तो इतर विकसित देशांमधील खर्चाच्या बरोबरीने आणण्याचे या धोरणाचे उद्दिष्ट आहे. यामुळे भारतीय उत्पादनांची भारतासह आंतरराष्ट्रीय बाजारपेठेतील स्पर्धात्मकता वाढेल. तसेच कमी झालेल्या खचार्मुळे अर्थव्यवस्थेच्या सर्वच क्षेत्रांमधील कार्यक्षमता वाढीस लागेल, परिणामी मूल्यवृद्धी आणि उद्योजकतेला प्रोत्साहन मिळेल.

या पार्श्वभूमीवर भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणा (एनएचएआय)ने चालू आर्थिक वर्षात ५२ महामार्ग प्रकल्पांसाठी निविदा मागवल्या आहेत. त्यांची एकूण लांबी २,१८८ किलोमीटर असून सर्व प्रकल्प पूर्णत्वाला जाण्यासाठी १.१५ लाख कोटी रुपयांचा भांडवली खर्च आवश्यक आहे. त्यामुळे रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालय २०२५-२६ मध्ये दहा हजार किलोमीटर राष्ट्रीय महामार्ग बांधण्याचे उद्दिष्ट जलदगतीने पूर्ण करण्यास मदत करू शकते. या ५२ प्रकल्पांपैकी १८ प्रकल्पांना मंजुरी देण्यात आली आहे, १५ प्रकल्पांचे मूल्यांकन करण्यात आले असून लवकरच मंजुरी देण्यात येईल, सहा प्रकल्प मंजुरीसाठी मंत्रिमंडळाकडे पाठवण्यात आले आहेत, दहा प्रकल्प स्थायी वित्त समितीकडे (एसएफसी) मूल्यांकनासाठी पाठवण्यात आले आहेत आणि तीन प्रकल्पांचा प्रस्ताव मंजुरीसाठी सादर करण्यासाठी तयार आहे. 'एनएचएआय'ने आर्थिक वर्ष २०२६ मध्ये ४,५०० किलोमीटर रस्ते देण्याचे आणि पाच हजार किलोमीटर रस्ते बांधण्याचे लक्ष्य ठेवले आहे. आतापर्यंत ५०४.३२ किलोमीटर लांबीचे ४३ प्रकल्प मंजूर केले आहेत आणि २,०६०.९९ किलोमीटरचे काम पूर्ण केले आहे. पहिल्या सहामाहीमध्ये सुरुवात मंद असली, तरी मंत्रालय निश्चितच वषार्साठी निश्चित केलेले उद्दिष्ट साध्य करेल. सप्टेंबरच्या अखेरीस, गेल्या वर्षी याच कालावधीत ३,८०० किलोमीटरच्या तुलनेत तीन हजार दोनशे किलोमीटर रस्ते पूर्ण करण्यात आले होते.

चालू आर्थिक वर्षातील पहिल्या महामार्ग मुद्रीकरणाच्या प्रकरणात 'आयआरबी इन्फ्रास्ट्रक्चर टोल ऑपरेट ट्रान्सफर' (टीओटी) मोडद्वारे मुद्रीकरण केलेल्या ऑपरेशनल मालमत्तेसाठी सर्वाधिक बोली लावणारी कंपनी म्हणून उदयास आली आहे. कंपनीने उत्तर प्रदेशमधील ३३३.४ किलोमीटर महामार्ग नेटवर्कसाठी ९,२०० कोटी रुपयांच्या ऑफरसह बोली जिंकली. ही कंपनी उच्च महसूल क्षमता असलेल्या महामार्गांमध्ये गुंतवणूक करते. भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाने चालू आर्थिक वषार्साठीचे त्यांचे मुद्रीकरणाचे लक्ष्य वाढवून ४० हजार कोटी रुपये केले आहे. त्याचा उल्लेख केंद्रीय अर्थसंकल्पात होता. २०२४-२५ मध्ये महामार्ग निर्मात्याने मुद्रीकरणाद्वारे २८,७२४ कोटी रुपये उभारले होते. या वर्षाच्या एकूण उद्दिष्टापैकी १५ हजार कोटी रुपये 'टीओटी' आणि 'इन्फ्रास्ट्रक्चर इन्व्हेस्टमेंट ट्रस्ट' (आयआयटी) मार्गाद्वारे येतील आणि उर्वरित प्रकल्पआधारित वित्तपुरवठ्यातून येतील.

'टीओटी'अंतर्गत सर्वात जास्त बोली लावणाऱ्या आणि तांत्रिक निकष पूर्ण करणाऱ्याला ज्या महामार्गासाठी सवलत मिळाली आहे, त्यावर टोल वसूल करण्याचा अधिकार मिळतो. सवलतीचा कालावधी २० वर्षांचा असतो. त्यानंतर मालमत्ता 'एनएचएआय'कडे परत येते. मालमत्तेच्या मुद्रीकरणाच्या पावत्या भांडवली खर्चासाठी 'एनएचएआय'कडे परत पाठवल्या जातात. सध्या रस्ते वाहतूक आणि महामार्ग मंत्रालयाच्या एकूण अर्थसंकल्पीय संसाधनांपैकी दहा टक्के मुद्रीकरण पूर्ण करत आहे. भारतीय राष्ट्रीय महामार्ग प्राधिकरणाद्वारे पायाभूत सुविधा गुंतवणूक ट्रस्ट मार्गाच्या पाचव्या फेरीसाठी मुद्रीकरणाची बोली प्रक्रिया लवकरच सुरू होईल. इतर प्रमुख गुंतवणूकदार आणि तपशील सरकारकडून तयार केले जात आहेत.

पुढील काही आठवड्यांमध्ये सुरू होणाऱ्या पाचव्या फेरीत 'एनएचएआय'ने एकूण ५५० किलोमीटरपेक्षा जास्त लांबीचे नऊ रस्ते मुद्रीकरणासाठी निवडले आहेत. हे रस्ते महाराष्ट्र, ओडिशा, आंध्र प्रदेश आणि पश्चिम बंगाल या राज्यांमधील आहेत. या वर्षी महामार्ग मुद्रीकरणाद्वारे निधी उभारणीसाठी ४० हजार कोटी रुपयांचे उद्दिष्ट ठेवण्यात आले आहे. राष्ट्रीय महामार्ग विकास प्राधिकरणाशिवाय राज्य रस्ते विकास महामंडळ, सार्वजनिक बांधकाम विभाग, स्थानिक स्वराज्य संस्थांचे बांधकाम विभाग आदी माध्यमांमधूनही देशात रस्ते बांधणीला चालना दिली जात आहे. त्यात पंतप्रधान ग्रामसडक योजना आणि मुख्यमंत्री ग्रामसडक योजनेच्या माध्यमातून गावा-गावांपर्यंत चांगले रस्ते तयार होत आहेत. पाणंद रस्त्यांच्या माध्यमातून थेट बांधावर पोहोचण्याची व्यवस्था होत आहे.

# नाशिकचा चेहरामोहरा बदलणार!

धनंजय बोडके नाशिकमध्ये १९८० सालापासून दर १२ वर्षांनी सिंहस्थ कुंभमेळा भरतो. त्याला युनेस्कोच्या जागतिक वारशाचा दर्जा लाभला आहे. त्या धर्तीवर केंद्र सरकारच्या पर्यटन विभागाने शहराचा आयकॉनिक स्थळात समावेश केला आहे. त्यामुळे त्या दृष्टीने नाशिक शहरात अनेक विकासकामांना वेग आला आहे. २०२७ साली नाशिकमध्ये भरणाऱ्या सिंहस्थ कुंभमेळ्यासाठी अंदाजे पाच लाख साधू- महंत येण्याची शक्यता आहे. जीडीपीच्या निकषावर भारतातील अव्वल १४ शहरांमध्ये नाशिकचे नाव अभिमानाने घेतले जाते. विकसनशील क्षमता, हवामान, औद्योगिक व पर्यटन क्षेत्रातील प्रगती यामुळे नाशिक आज देशाच्या आर्थिक नकाशावर आपली स्वतंत्र ओळख निर्माण करत आहे. येत्या सिंहस्थ कुंभमेळ्याच्या निमित्ताने या शहराचा चेहराझमोहरा अधिक वेगाने बदलणार आहे. या महत्त्वाच्या धार्मिक सोहळ्यामुळे शहरात अनेक मूलभूत सुविधा उभारल्या जाणार आहेत. यात प्रमुख्याने रिंग रोड, त्र्यंबक दर्शन पथ, रामकाल पथ, गोदाकाठी अद्ययावत सांडपाणी शुद्धीकरण प्रकल्प (एसटीपी) यांसारख्या विकासकामांचा समावेश आहे. कुंभमेळ्यात नाशिक आणि त्र्यंबकेश्वरमध्ये एकूण २५ हजार कोटींची कामे प्रस्तावित आहेत. प्रयागराज, हरिद्वार, उज्जैन आणि नाशिकझत्र्यंबकेश्वर या चार ठिकाणी दर १२ वर्षांनी कुंभमेळा भरतो. प्रत्येक कुंभमेळ्याच्या काळात त्या त्या शहराचा सर्वांगीण विकास होतो, ही परंपरा पाहायला मिळते. काही महिन्यांपूर्वी झालेल्या प्रयागराज कुंभमेळ्याचे उदाहरण घ्यायचे झाले, तर तेथील अर्थव्यवस्था लाखो भाविकांच्या आगमनामुळे प्रचंड गतीमान झाली. पर्यटन, हॉटेल, परिवहन या सर्व क्षेत्रांमध्ये विकासाची लाट उसळली. यासोबतच पायाभूत सुविधा उभारण्यावरही मोठा खर्च करण्यात आला. याच धर्तीवर आता नाशिक व त्र्यंबकेश्वर या दोन्ही ठिकाणी मोठ्या



प्रमाणात विकासकामे सुरू होणार आहेत. तपोवन परिसरात काही विदेशी (परकीय) झाडे तोडण्याच्या निर्णयाविरोधात मागील काही आठवड्यांपासून पंचवटीमध्ये राज्यभरातील पर्यावरणप्रेमी आंदोलन करत आहेत. पर्यावरण संवर्धन हा नक्कीच महत्त्वाचा मुद्दा आहे; परंतु या आंदोलनातून खऱ्या वृक्षसंवर्धनापेक्षा राजकीय प्रेम अधिक प्रकषार्ने दिसून आले आहे, असे चित्र जाणवते. कारण विरोध केवळ झाडतोडीपुरता नसून, निर्णय कुंभमेळा मंत्र्यांनी घेतल्यामुळे विरोधी पक्ष व संबंधित संघटनांकडून राजकीय टीका अधिक केल्या जात असल्याचे दिसत आहे. आंदोलन लोकशाहीचा हक्क असून पर्यावरणाचे रक्षण महत्त्वाचेच आहे; मात्र विकासकामांवर थेट परिणाम होईल असे आंदोलन शहराच्या भविष्यास बाधक ठरू शकते. अधिकारी निर्णय घेताना असुरक्षित राहतील, विकासाची गती मंदावेल असा धोका व्यक्त केला जात आहे. नाशिकच्या प्रगतीला गालबोट लागू नये, ही सर्व नाशिककरांचीच अपेक्षा आहे. त्यामुळे या प्रश्नावर समोपचाराने मार्ग काढणे आवश्यक आहे. आगामी सिंहस्थ कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर नाशिक आणि त्र्यंबकेश्वर येथे ७ ते ८ हजार कोटी रुपयांची रिंग रोड उभारली जाणार आहे. हे प्रकल्प केवळ वाहतुकीसाठीच नाही तर शहराच्या दीर्घकालीन प्रगतीसाठीही मोठे पाऊल आहे. रिंग रोड पूर्ण झाल्यानंतर पुढील २५झ३० वर्षांची वाहतूक कोंडी मोठ्या प्रमाणावर सुटण्याची शक्यता आहे. यातील काही जणांना विलंब जरी झाला, परंतु ते मंजूर असल्याने सिंहस्थानंतर देखील पूर्ण होणार आहे. विकासकामांमुळे नाशिकच्या औद्योगिक विकासाला चालना मिळेल, पर्यटन क्षेत्रात गुंतवणूक वाढेल, नवीन रोजगार निर्मिती होईल, शहरातील प्रदूषणात घट होईल, सिंहस्थ कुंभमेळ्याच्या निमित्ताने नाशिक व त्र्यंबकेश्वर केवळ धार्मिक केंद्र म्हणून नव्हे तर सुव्यवस्थित, आधुनिक आणि प्रगत शहर म्हणून विकसित होण्याच्या दिशेने वाटचाल सुरू करत आहेत. हा बदल केवळ शासनाचा नव्हे, तर सर्व नाशिककरांचा सामूहिक सहभागाने पूर्ण होणारा विकास आहे. या संपूर्ण पार्श्वभूमीवर मुंबई-आग्रा महामार्ग (एनएच-३) अगदी दोन कुंभमेळ्यांआधी नाशिकच्या बाहेर होता, पण अलीकडच्या पंधरा-वीस वर्षांत तो शहरातूनच जातोय. नाशिकचा प्रसिद्ध १७ किलोमीटर लांबीचा उड्डाणपूल याच परिसरात आहे. द्वारका चौकातून कन्नमवार पूल ओलांडल्यावर उजवीकडे अनेक मंदिरं-मठांचे कळस दिसतात. तेच प्रसिद्ध तपोवन. या परिसरातच कपिला आणि गोदावरीचा संगम आहे. ज्याच पाणी सांडपाण्याचे पाइप सोडल्यानं प्रदूषित झालं आहे. २०००च्या आसपास या परिसरात मोजून तीन-चार इमारती, शेतकऱ्यांची घरं आणि एक-दोन मठ-महंतांचे आश्रम होते. २००३च्या कुंभमेळ्याच्या वेळी इथे रस्त्यांपासून अनेक पायाभूत सोयी-सुविधा उभारल्या गेल्या. २०१५च्या कुंभमेळ्यात साधुग्राम ३५० एकरवर होतं आणि २.५ लाख साधूंसाठी ते पुरेसं होतं. नाशिक-छत्रपती संभाजीनगर महामार्गाच्या दोन्ही बाजूंना, मुख्य तपोवनाकडे जाताना राहुट्या उभारण्यात आल्या होत्या. आता २०२७ च्या कुंभमेळ्यासाठी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या उपस्थितीत नाशिकच्या सर्व विभागाच्या प्रमुख अधिकाऱ्यांची मुंबईत बैठक झाली. यावेळी नाशिक विभागीय अधिकारी डॉ. प्रवीण गेडाम यांनी ७ हजार ७६७ कोटी रुपयांच्या आराखड्याचं सादरीकरण केलं. या सादरीकरणात, साधूंची संध्या गेल्या वेळपेक्षा चार पटींनी वाढणार असल्याने साधुग्रामसाठी अधिक जागा लागणार असल्याचं स्पष्ट झालं. कुंभमेळ्याच्या पार्श्वभूमीवर तपोवनात साधुग्रामसाठी ३५० एकरपेक्षा जास्त जागा देण्यास जागा मालकांचा विरोध आहे; परंतु महापालिकेने ५० टक्के टीडीआर व ५० टक्के रोख स्वरूपात मोबदला देण्याचा प्रस्ताव शेतकऱ्यांनी फेटाळला आहे. ज्या भागात अधिक रेडिरेकनरचे दर आहेत, त्यानुसारच संपूर्ण मोबदला रोख स्वरूपातच देण्यात यावा, अशी शेतकऱ्यांनी आक्रमक भूमिका घेतली. तपोवनात साधुग्रामसाठी ३५० एकरवर आरक्षण टाकण्यात आले आहे. त्यातील ९७ एकर जागा महापालिकेने ताब्यात घेतली आहे. उर्वरित जागा मोबदला देऊन ताब्यात घेण्यासाठी महापालिकेने सुमारे २८० स्थानिक शेतकऱ्यांना नोटीस पाठवल्या. त्या आनुषंगाने महापालिकेच्या स्थायी समितीच्या सभागृहात शेतकऱ्यांचे म्हणणे ऐकून घेण्यासाठी झालेल्या सुनावणीत शेतकऱ्यांचे समाधान झाले नाही. त्यामुळे याबाबत पुढील काही दिवसांत तोडगा निघेल, अशी अपेक्षा व्यक्त केली जात आहे.

# बदलत्या धोरणाने साखरपट्टा हैराण

दक्षिण महाराष्ट्राचा साखरपट्टा काळानुसार उद्योग-विकासाचा ठेवा असला तरी, आताची आर्थिक परिस्थिती चिंताजनक आहे. कारखान्यांनी इथेनॉल क्षमतेकडे वळण्यास मोठी गुंतवणूक केली. डिस्टिलरी व बायोइंधन युनिट उभारण्यावर हजारो कोटींची रक्कम कर्ज उभे करून गुंतवली आहे. ते सगळेच सध्या अडचणीत आहेत. उपायांवर तातडीने कृती न झाल्यास दक्षिण महाराष्ट्रातील साखर कारखानदारांची आर्थिक स्थिती आणखी बिकट होईल. सरकारने इथेनॉल ब्लेंडिंग वाढवण्यावर भर दिल्याने गेल्या काही वर्षांत तेल कंपन्यांकडून इथेनॉलची खरेदी मोठ्या प्रमाणावर वाढवली गेली; परंतु मागील काही तिमाहींत खरेदीच्या पद्धतीत व प्रमाणात अनियमितता आणि अपेक्षित गती मिळाली नाही. सरकारी आकडेवारीनुसार इएसवाय अर्थात इथेनॉल सप्लाय इयर २०२३झ२४ मध्ये एकूण ७०७ कोटी लिटर इतका इथेनॉल खरेदी/ब्लेंडिंग नोंदला गेला; परंतु २०२४झ२५च्या सुरुवातीस मिळणाऱ्या आकडेवारीनुसार ब्लेंडिंगदर महिन्याअखेर बदलत राहिला; जुलै २०२५ मध्ये सरासरी ब्लेंडिंग सुमारे १९% वर नोंदले गेले. म्हणजे मागणीत काही प्रमाणात वाढ झाली असली तरी ती सर्वच कारखान्यांसाठी स्थिर करण्यात आलेली नाही. कारखान्यांनी इथेनॉल क्षमतेकडे वळण्यास मोठी गुंतवणूक केली. डिस्टिलरी व बायोइंधन युनिट उभारण्यावर हजारो कोटींची रक्कम कर्ज काढून गुंतवली आहे. माध्यमांमधील अहवालांनुसार साखर कारखाने आणि इतर उद्योगांनी इथेनॉल क्षमतेसाठी अंदाजे ४० हजार कोटींपर्यंत गुंतवणूक केली आहे; परंतु तेल कंपन्यांकडून खरेदीचे ठरावीक टेंडर व दीर्घकालीन खरेदी पर्याय न मिळाल्याने या गुंतवणुकीचा लाभ अपेक्षेनुसार प्राप्त होत नाही. अशा गुंतवणुकीवर घेतलेले कर्जही मोठे आहे आणि ते परतफेडीसाठी उद्योगाला दडपण वाढेल अशी चिंता आहे. हे दडपण शेवटी कारखान्यांची चाके रुतण्यापर्यंत वाढू शकते. सरकारकडून साखर निर्यातीवरील निर्बंध आणि धोरणात्मक निर्णयही उद्योगावर प्रभाव टाकतात. २०२३-२४ सीझनपासून भारताने मोठ्या प्रमाणावर निर्यातीवर मर्यादा आणल्या. २०२४ मध्ये निर्यातबंदी/मर्यादेचे निर्णय पडताळले गेले. पण या काळात पुरवठा साखळी बाधित झाल्यामुळे जागतिक बाजारात भारताचा पुरवठा कमी झाला आणि दरांची अनिश्चितता निर्माण झाली. एका अहवालानुसार सरकारने कधीकधी निर्यात मर्यादा आणि इथेनॉल प्रोत्साहनामुळे स्थानिक पुरवठा आणि इथेनॉलला प्राथमिकता दिली आहे; परंतु वास्तविक बाजारात त्यामुळे तत्काळ आर्थिक मदत कशी होईल हा प्रश्न अनुत्तरीत राहतो. जागतिक साखर बाजारपेठेतील दरांमध्ये चढ-उतार अतिशय तीव्र आहेत. आंतरराष्ट्रीय फ्युचर्स आणि ट्रेडिंग डेटा दाखवतो की कधीकधी डॉलर/पाउंडच्या दरांमध्ये महिन्यांत ५-१०% चढ-उतार सामान्य झालेला आहे; किंबहुना २०२४-२५च्या काळात ब्राझीलच्या उत्पादनातील घट आणि भारतीय निर्यातींच्या मयार्देमुळे जागतिक दरांवर दबाव पडला. ट्रेडिंग इकॉनॉमिक्सच्या स्रोतांनुसार जागतिक मागणी-पुरवठा संतुलन अनिश्चित असल्याने भारतीय कारखान्यांसाठी निर्यातातून अपेक्षित निराकरण वेळोवेळी बदलते. त्यामुळे स्थानिक विक्रीमुळे मिळणारी कमाईदेखील अस्थिर बनली आहे. दक्षिण महाराष्ट्रातील कारखान्यांची स्वतःची आर्थिक आकडेवारीही स्पष्टच धोकादायक आहे. काही उद्योग अहवालांनुसार साखर उत्पादन अंदाज आणि ईथेनॉल व्हेरियबल्स विचारात घ्यावेत, तर २०२५ मध्ये देशस्तरीय शिल्लक व उत्पादन हा स्पष्ट अंदाजाबाहेर असून अनेक कारखान्यांवर कार्यकारी भांडवल आणि बँक कर्जांचे ताण वाढले आहे. भारतीय साखर कारखानदार संघटनेच्या ताज्या अंदाजानुसार नेट साखर उत्पादन व इथेनॉलकडे डायव्हर्जन या दोन्ही गोष्टींमुळे कारखाने वेगवेगळ्या परिणामांना सामोरे जात आहेत. अर्थात, महाराष्ट्र हे राज्य इथेनॉल क्षमतेमध्ये अग्रक्रमावर असले तरीही स्थानिक कारखान्यांना कर्ज परतफेडीसाठी तरलता मिळणे हे मोठे आव्हान ठरले आहे. स्थानिक पातळीवरील परिणाम गंभीर आहेत. ऊस खरेदीचे दर वाढत असताना साखरेचा विक्री दर स्थिर किंवा काही भागांत घटत असल्याने (काही ठिकाणी प्रति क्विंटल दरांमध्ये घट नोंदली गेली) कारखान्यांचा मॅर्जिन तुरळक झाला आहे. एफआरपीची कायदेशीर बांधिलकी असताना पैसे देण्यासाठी बँक कर्जावाचून कारखाने अडचणीत येतात. परिणामी शेतकऱ्यांना एफआरपी उशिरा मिळणे, थकबाकी वाढणे आणि पुढील हंगामासाठी तणाव सुरू झाले आहेत.

# बो-टाय पास्ता सॅलड

**साहित्य :** १ वाटी बो-टाय पास्ता (टायचा बो अर्थात गाठीप्रमाणे आकार असलेला पास्ता), १०० ग्रॅम बोनलेस चिकन, ३ ब्रेड स्लाइस, ४-५ लसूण पाकळ्या, ५० ग्रॅम ऑलिव्ह तेल, १०० ग्रॅम प्रोसेस्ड चीझ, २ अंड्यांचे पिवळे बलक, मीठ चवीनुसार, ८-१० लेट्युसची पाने, हवे असल्यास चिली फ्लेक्स.



**कृती :** सगळ्यात आधी पास्ता मिठाच्या उकळत्या पाण्यातून उकडून घ्या. बो-टाय पास्ता मिळाला नाही किंवा आवडत नसेल तर मॅक्रोनी किंवा तुमच्या आवडीचा पास्ता घेता येईल. पास्ता उकडल्यावर लगेचच पाण्याखाली गार करा आणि थोडं तेल लावून फ्रीजमध्ये ठेवा. लसणीचे बारीक बारीक तुकडे करून घ्या. चिकनला मीठ, मिरपूड लावून पॅनमध्ये थोड्याशा ऑलिव्ह तेलात शिजवून घ्या. ब्रेड स्लाइसचे छोटे छोटे चौकोनी तुकडे करून ते पॅनमध्ये भाजून घ्या. यात थोडंसं तेल आणि लसूण घालून त्याला छान लसणीचा स्वाद येऊ द्या. चीझ किसून ठेवा. अंड्याचे पिवळे बलक चांगले लुसलुशीत होईपर्यंत फेटून घ्या. त्यात चीझ घाला आणि थोडंसं ऑलिव्ह तेल घाला. मिश्रण फेटून घ्या.

एका बाऊलमध्ये लेट्युसची पाने, पास्ता, चिकन आणि ब्रेडचे तुकडे एकत्र टॉस करा. त्यावर बनवलेले चीझ आणि अंड्याचे ड्रेसिंग वाढा. आता हे सॅलड थंड करून पेश करा.

# फेस स्क्रब डोळ्यांच्या पापण्यांवर वापरणे योग्य आहे का?

**जर तुम्ही वारंवार मेकअप करीत असाल तर शक्य असेल तेव्हा मेकअप करणे टाळा. प्रत्येकवेळी मेकअप केल्यावर तो एखाद्या चांगल्या क्लिनझरने काढून टाका. ब्युटी एक्स्पर्ट आश्मीन मुंजल यांच्याकडून जाणून घेऊयात**

**संपूर्ण** चेहऱ्यात डोळे हा फार नाजूक अवयव आहे. त्यात डोळ्यांच्या पापण्या हा तर अति संवेदनशील भाग आहे. त्यामुळे निरोगी राहण्यासाठी व सौंदर्य टिकवण्यासाठी त्यांची डोळ्यांची योग्य निगा राखणे फार गरजेचे आहे. जर तुम्ही वारंवार मेकअप करीत असाल तर शक्य असेल तेव्हा मेकअप करणे टाळा. प्रत्येक वेळी मेकअप केल्यावर तो एखाद्या चांगल्या क्लिनझरने काढून टाका. ब्युटी एक्स्पर्ट आश्मीन मुंजल यांच्याकडून जाणून घेऊयात डोळ्यांच्या पापण्यांची निगा कशी राखावी.



सर्वात महत्त्वाची गोष्ट म्हणजे डोळ्यांच्या पापण्यांवर कधीही स्क्रब वापरू नका. कारण तुमच्या पापण्यांवरील अतिसंवेदनशील त्वचा व पापण्यांवरील केस यावर अति सौंदर्यप्रसाधनांचा वापर केल्यामुळे त्यांचे नुकसान होऊ शकते. खरं तर पापण्यांना फार स्वच्छतेची गरज नसते व पापण्यांवर फेस स्क्रब तर मुळीच वापरू नयेत.

तसेच चेहऱ्यासाठी वापरण्यात येणारे फेस स्क्रब डोळ्यांच्या पापण्यांसाठी योग्य नसतात. कारण ते पापण्यांच्या त्वचेसाठी त्रासदायक ठरू शकतात. मात्र जर तुमच्या भुवयांच्या केसांमध्ये कोंडा असणे किंवा तुम्हाला पापण्यांजवळील त्वचा कोरडी असण्याची समस्या असेल तर तुम्ही अगदी सौम्य स्क्रब वापरू शकता. यासाठी अति दाणेदार अथवा खरखरीत नसलेले एखादे सौम्य ॲप्रिकॉट स्क्रब तुम्ही घेऊ शकता. या स्क्रबचा काही भाग घ्या व त्यामध्ये थोडे मॉश्चरायझर मिसळून तुम्ही त्याचा हलक्या हाताने तुमच्या पापण्यांवर मसाज करू शकता. हा मसाज करताना एक गोष्ट नेहमी लक्षात ठेवा हा मसाज क्लॉकवाइज करावा.



जर तुमच्या पापण्यांवरील केस पातळ व कमजोर असतील तर मात्र तुमच्या डोळ्यांच्या आजूबाजूला कोणतेही सौंदर्यप्रसाधने वापरू नका. जर तुमच्या पापण्यांवरील केस दाट असतील व तुम्हाला कोरड्या त्वचेची समस्या असेल तर तुम्ही वर दिलेले मिश्रण वापरू शकता. डोळ्यांच्या पापण्यांवर कोरफडाचे जेल अथवा मास्क वापरणे योग्य ठरेल.

# सकाळची न्याहारी किती आवश्यक आहे!

**सकाळची** न्याहारी शरीरासाठी किती आवश्यक आहे, हे सर्वजण जाणत असूनही अनेक लोक सकाळच्या नाश्त्याकडे दुर्लक्ष करून घराबाहेर पडतात. त्याचे दुष्परिणाम मग त्यांच्या शरीरावर होतात.

सकाळचा नाश्ता निरोगी राहण्यासाठी फार महत्त्वाचा आहे. नाश्ता शरीरात ऊर्जा निर्माण करतो. नाश्ता करणारे लोक नाश्ता न करणाऱ्या लोकांपेक्षा अधिक धडधाकट असतात. सकाळी उठल्यानंतर एक तासात नाश्ता करायला हवा. नाश्ता केल्याने मेंदूला चालना मिळते व एकाग्रता वाढायलाही मदत होते. शाळा-कॉलेजांत जाणारी बरीचशी मुले जी नाश्ता करत नाही, त्यांचे लक्ष अभ्यासात केंद्रित होत नाही. पण समतोल नाश्ता घेतला तर अनेक आजारांपासून आपला बचाव होऊ शकतो.



सकाळच्या नाश्त्यात प्रथिने, खनिज, व्हिटॅमिन, फायबर, कार्बोहायड्रेट इत्यादी घटकांचा समावेश करा. नाश्त्यामध्ये भाज्या, फळं, दूध, मोड आलेले कडधान्य, पनीर, दही, सालीच्या डाळी इत्यादींचा समावेश करा. तसेच संमिश्र भाज्या मिळवलेले पोहे, ओट्स, उपमा, दालिया, चिलाल चपाती, इडली, उकडलेले अंडे इत्यादी घेऊ शकता.

सकाळचा नाश्ता केल्यास हृदयरोग, अल्सर, मधुमेह, लठ्ठपणा यासारख्या आजारापासून बचाव होऊ शकतो.

# आपल्याला होते फूड ॲलर्जी, तर हे करा

**जेव्हाही** आपले शरीर खाण्याप्रती अधिक क्रियाशील होते तेव्हा फूड ॲलर्जीची तक्रार होऊ शकते. अशात काही प्रोटीनयुक्त आहारदेखील आपल्या शरीराला नुकसान करू शकतात कारण काही लोकांची प्रतिकारशक्ती काही पदार्थांना प्रतिसाद देऊ शकत नाही आणि त्याचे दुष्परिणाम म्हणून ॲलर्जी दिसून येते. मुख्यतः लोकांना मैदा, सोया, अंडी, मासे, शेंगदाणे, काही विशिष्ट मसाले किंवा एखाद्या तेलाच्या प्रकारची ॲलर्जी असते. कधी कधी ॲलर्जी टेस्ट मध्येही ॲलर्जी नेमकी कसली आहे हे कळून येत नाही. अशात ते आपल्यालाच शोधून काढायला हवे. एकदा ॲलर्जी कोणत्या पदार्थाची आहे समजल्यावर पथ्ये पाळणे आवश्यक असतं.

**सामान्यतः ॲलर्जीची ही लक्षणे असतात** ▮खाज सुटणे ▮अतिसार ▮डोळे, ओठ आणि चेहऱ्यावर सूज येणे ▮श्वास घ्यायला त्रास होणे ▮हृदयाच्या ठोक्यांची गती वाढणे

**यापासून वाचण्यासाठी**

▮जर आपल्या खाण्यामुळे त्रास होत असेल तर खाण्याशी संबंधित सर्व धान्य टाळावे. ▮बाहेर आहार घेताना विशेष काळजी घ्यावी.

# लंचनंतर अजिबात नका करू हे काम

**ब्रश करणे :** लंचनंतर ब्रश करणे योग्य नाही. कारण आपण सिट्स असलेला आहार घेतला असल्यास ब्रश केल्याने दातांवरील ती परत निघून जाते ज्याला इनेमल असे म्हणतात.



**अधिक पाणी पिणे :** आपण जेवल्यानंतर अधिक मात्रेत पाणी पित असल्यास पाचक प्रणालीवर याचा गंभीर प्रभाव होतो. यामुळे अनेक रोग उद्‌भवण्याची शक्यता असते. खरं म्हणजे जेवताना आणि जेवण झाल्यावर लगेच पाणी पिणे विष समजले जाते. जेवण झाल्यावर कमीत कमी अर्धा किंवा तासाभरानंतर पाणी पिणे योग्य आहे.

**फिरणे :** काय आपण ही लंच घेतल्यानंतर फेऱ्या मारता? पण ही एक हानीकारक सवय आहे जी लगेच थांबवायला हवी. तज्ज्ञांप्रमाणे आमची पाचक प्रणाली इतकी मजबूत आहे की लंचमध्ये आपण कितीही अटरम- शटरम खाल्लं असेल तरी सर्वकाही पचून जातं. या दरम्यान आमची प्रणाली आहाराला पचवून सर्व आवश्यक पोषण आम्हाला ऊर्जेच्या रूपात देतं. पण आमचे हे सिस्टम जरा संवेदनशील असल्यामुळे तेव्हा त्याला आपले कार्य सुरळीतरीत्या पार पडण्यात अडथळा निर्माण होतो जेव्हा आपण त्याला यातना देतात. म्हणून दुपारी लंच केल्यानंतर फिरणे किंवा काही हेवी कार्य करण्याऐवजी १५ ते २० मिनिटे आराम करण्याचा सल्ला दिला जातो.

**ड्रायव्हिंग :** जेवण पचवण्यासाठी अधिक रक्ताची गरज असते, ज्यासाठी मेंदू मदत करतं. परंतु जेवल्यानंतर आपण ड्रायव्हिंग करत असाल तर मेंदू त्यावर आपलं लक्ष केंद्रित करतो आणि जेवण पचवण्यात त्याची मदत मिळत नाही.

**झोपणे :** लंचनंतर लगेच झोपल्याने पचन संबंधी रोग होऊ शकतात. याने आपल्या गॅससंबंधी समस्याही उद्‌भवू शकते.

# फोनचे ब्लूटूथ नेहमी ऑन असते?
## मिनिटात होऊ शकते डिव्हाइस हॅक, असे राहा सेफ

जर तुम्ही तुमच्या फोनमध्ये नेहमी ब्लूटूथ चालू ठेवत असाल तर, सावध व्हा. कारण, यामुळे तुमचा फोन हॅक देखील होऊ शकतो. जाणून घेऊया याबद्दल सविस्तर. ब्लूटूथ सर्व फोनमध्ये असते आणि बरेच लोक ते सतत वापरतात सुद्धा. स्मार्टफोन, टॅबलेट आणि लॅपटॉपमध्ये ब्लूटूथ आधीच दिलेले आहे. एका डिव्हाइसवरून दुसऱ्या डिव्हाइसमध्ये फाइल ट्रान्सफर करण्यासाठी ब्लूटूथची आवश्यकता असते. पण तुम्हाला माहीत आहे का ? डिव्हाइसमध्ये असलेले ब्लूटूथ जितके सोयीस्कर आहे तितकेच ते धोकादायकसुद्धा असू शकते. हॅकर्स ब्लूटूथद्वारे तुमचे डिव्हाइस हॅक करू शकतात. त्याला ब्लूबगिंग असेही म्हणतात. ब्लूटूथ हॅकिंग कसे केले जाते आणि त्यापासून तुम्ही कसे सुरक्षित राहू शकता, याबद्दल ही महत्त्वाची माहिती.

**ब्लूटूथ हॅकिंग कसे काम करते?**

हॅकर्स एक विशिष्ट सॉफ्टवेअर वापरतात, जे आपोआप ब्लूटूथने सुसज्ज असलेली उपकरणे शोधतात. हॅकर्स हेदेखील पाहू शकतात की, तुमचे डिव्हाइस आधी कोणत्या नेटवर्कशी कनेक्ट केले गेले आहे. फोन आधीपासून कनेक्ट केलेले नेटवर्क पुरेसे विश्वासार्ह मानतो आणि भविष्यात त्यांच्याशी आपोआप कनेक्ट होतो. सायबर गुन्हेगारांना तुमच्या डिव्हाइसचे विश्वसनीय नेटवर्क माहीत असल्यास, ते त्याद्वारे तुमच्या डिव्हाइसशी कनेक्ट होतात. यानंतर तुमचे डिव्हाइस हॅक होते. त्यानंतर हॅकर्स डिव्हाइसमध्ये मालवेअर इन्स्टॉल करतात. याद्वारे हॅकर्स तुमची हेरगिरी करतात. तुमचे मेसेजेस वाचतात आणि डेटा देखील चोरू शकतात.



**यापासून सुरक्षित कसे राहायचे?**

डिव्हाइस वापरात नसताना ब्लूटूथ डिसेबल करा. तुम्हाला फाइल्स ट्रान्सफर करायच्या असतील तर, तुम्ही एयर ड्रॉप किंवा फास्ट शेयर वापरू शकता. ब्लूटूथ सेवांची प्रवेशक्षमता मर्यादित करा. हे ब्लूबगिंग टाळते. तुमच्या स्मार्टफोन, टॅबलेट आणि ब्लूटूथ सक्षम संगणकांवर तुमच्याकडे ॲंटीमालवेअर ॲप स्थापित असल्याची खात्री करा. एखाद्या हॅकरने तुमच्या डिव्हाइसमध्ये शिरण्याचा प्रयत्न केल्यास, ॲंटी-मालवेअर ॲप तुमची गोपनीयता आणि वैयक्तिक डेटा संरक्षित करताना संशयास्पद ॲक्टीव्हीटीज शोधू आणि ब्लॉक करू शकतो.

# दुधाबरोबर मध घेण्याचे फायदे जाणून घेऊया

**आपल्याला** हे माहीतच आहे की, नियमित दूध पिणं आरोग्यासाठी फायदेशीर आहे; परंतु जर आपण दुधात मध घातले तर त्याचा फायदा दुपटीने होतो. असे केल्यास आरोग्यविषयक समस्यांपासून आपण मुक्त होऊ शकतो.

▮ दररोज एक कप दुधात मध घालून प्यायल्याने शारीरिक आणि मानसिक आरोग्यासाठी फायदेशीर असते. हे दोन्ही प्रकारच्या क्षमता वाढवण्यास उपयुक्त आहे.

▮ अनिद्रेची समस्या असल्यास रात्री कोमट दुधात मध टाकून प्या, असे केल्यास अनिद्रेची समस्या नाहीशी होते आणि त्वरित आराम मिळतो.

▮ पचन सुधारण्यासाठी दुधात मध घालून पिण्याने बद्धकोष्ठतेच्या त्रासापासून सुटका होते.

▮ दुधात प्रथिने आणि कॅल्शियम भरपूर प्रमाणात असतात आणि मध रोग प्रतिकारक शक्ती वाढवण्यास सक्षम असतं. यांना एकत्र करून प्यायल्याने उत्तम आरोग्य पर्याय असल्याचे सिद्ध करतात.

▮ ताणतणाव दूर करण्याचे हे एक उत्तम साधन आहे. कोमट दुधात मध घालून प्यायल्याने प्रजनन क्षमता आणि शुक्राणूंची संख्या वाढविण्यास मदत होते.



# केसगळती रोखणारा 'वन मिनिट' उपाय!

**केसगळती ही काही प्रमाणात प्रत्येकामध्ये आढळून येते. केसगळतीचे प्रमाण दिवसाला १०० पेक्षा अधिक असल्यास ती समस्या गंभीर आहे. या समस्येचे एक कारण म्हणजे टाळूला होणारा अपुरा रक्तप्रवाह! मग त्यावरचा एक उपाय म्हणजे टाळूला मसाज करा.**



**केस** धुतल्यानंतर बोटांनी टाळूला मसाज करणे हा केसगळती रोखण्याचा एक सहज-सोपा घरगुती उपाय आहे. मग केसगळती रोखण्यासाठी जरूर टाळा या चुका!

**कसे आहे फायदेशीर?**

डॉ. एच. के. भाकरू यांच्या 'होम रेमेडीज फॉर कॉमन इएलमेंट्स' या पुस्तकात लिहिल्यानुसार थंड पाण्याने केस धुतल्यानंतर टाळूवर हातांच्या बोटांनी मसाज करावा. यामुळे डोक्याजवळील रक्तवाहिन्यांना चालना मिळाल्याने रक्तप्रवाह सुधारतो. परिणामी केसांची वाढदेखील सुधारते.



**तुम्ही काय कराल ?**

तुमच्या सोयीनुसार पाण्याचे तापमान, शाम्पूने केस धुवा. मात्र शेवटी ते कोमट किंवा साध्या पाण्याने धुवून निथळत ठेवा. यामुळे केस गुंतण्याची शक्यता कमी होते. केसांचे गुंतणे रोखण्यासाठी करून पहा हे उपाय.

काही वेळाने केस टॉवेलने पुसा आणि कोरडे करा. त्यानंतर हाताच्या बोटांनी गोलाकार दिशेने मसाज करा.

**खबरदारीचा उपाय**


मसाज करताना तो हळूवार आणि समान प्रमाणात असावा. खूप जोरजोरात केस घासणे, मसाज करताना नखांचा वापर करणे टाळा. यामुळे केसांचे नुकसान होऊ शकते.

## सायीचा उपयोग रंग उजळण्यासाठी करावा

▮ मुलतानी माती बारीक करून सायीत मिसळून चेहऱ्यावर तसेच कोपरावर लावल्यास रंग उजळतो.

▮ तीन चार बदाम आणि दहा बारा देशी गुलाबाच्या पाकळ्या वाटून त्यात एक चमचा साय मिसळून ते मिश्रण चेहऱ्यावर लावल्यास चेहऱ्यावरच्या सुरकुत्या आणि काळे डाग नाहीसे होतात.

▮ सायीत समुद्र फेसची बारीक पावडर मिळवून लावल्यास चेहऱ्यावरची मुरमे बरी होतात.



▮ मोसंबी किंवा संत्र्याची सालं वाटून त्यात साय मिसळून त्याचा लेप लावल्यास त्वचा मुलायम व स्वच्छ होते.

▮ एक चमचा साय व एक चमचा सफरचंदाचा रस एकत्र करून फेटून हलक्या हाताने चेहऱ्यावर मालीश केल्यास चेहऱ्याचा रंग उजळतो.

▮ सायीचा उपयोग औषधासारखाही होतो.

# दही कधी खावे?

**संपूर्ण** वर्षभरामध्ये ज्या ऋतूमध्ये दही अगदी निषिद्ध समजले पाहिजे, असा ऋतू म्हणजे वसंत. वसंत म्हणजे थंडीनंतर येणारा उन्हाळा, सध्या सुरू असलेले दिवस. वसंत ऋतूमधील कफ प्रकोपाचा विचार करता पाळावयाचा नियम म्हणजे दही वर्ज्य करणे. शरीरामध्ये कफ वाढवणारे दही वसंत ऋतूमध्ये सेवन करण्याचा निषेध शास्त्राने केला हे स्वाभाविकच आहे. वसंत ऋतूमधील दह्याचे काही विशिष्ट गुणदोष असतात. ते दही गोड व आंबट चवीचे असते. गोड व आंबट हे दोन्ही रस वसंतामध्ये टाळणे अपेक्षित आहे. ते शरीरामध्ये स्निग्धत्व वाढवणारे असते. वसंत ऋतूमध्ये स्निग्धत्व वाढवणारा आहार टाळायचा असतो. याशिवाय वसंतातल्या दह्याचा अजून एक दोष म्हणजे ते वातल (वात वाढवणारे) असते. त्यामुळे वात प्रकृतीच्या व्यक्तींना, वातविकाराने त्रस्त लोकांना ते योग्य नाहीच.

याशिवाय दही हे अभिष्यन्दी आहे, म्हणजे स्राव वाढवणारे आहे, ज्या दोषामुळे शरीरामध्ये पाणी वाढते. वसंत ऋतूमध्ये आधीच कफ पातळ झाल्यामुळे शरीरामध्ये स्राव, पाणी वाढलेले असताना दह्याचा शास्त्राने निषेध केलेला आहे. दही हे सूज सुद्धा वाढवते, अर्थात अतिप्रमाणात व अवेळी सेवन केले तर. दह्याबाबत वसंत ऋतू ही अवेळ आहे. वसंतामध्ये कफाचा जोर असताना सांधे हे कफाचे स्थान असल्याने सांध्यामधल्या श्लेष्मल त्वचेला सूज येण्याची व त्या श्लेष्मल त्वचेमधून स्राव वाढण्याची शक्यता बळावते. म्हणूनच सूज व स्राव वाढवणाऱ्या दह्याचा त्याग या दिवसांमध्ये करायचा आहे. अर्थात जिथे-जिथे स्राव स्रवतात, ते स्राव वाढवण्याचा, जिथे-जिथे सूज आहे तिथे सूज वाढवण्याचा धोका वसंतामध्ये दही खाल्ल्याने बळावतो.

या दिवसांमध्ये उन्हाळा सुरू झाला म्हणून दह्याचे सेवन सुरू केल्यानंतर विविध कफविकार, उष्णतेचे विविध रोग आणि सूजसंबंधित विकृती झाल्याचे अनुभव दरवर्षी अनुभवायला मिळतात.

उपचाराला दही न खाण्याची जोड दिली तरच हे आजार बरे होतात. केवळ औषधोपचारानंतर आजाराची लक्षणे कमी होतात; पण तात्पुरती; दही खाणे थांबवल्यानंतर मात्र या रुग्णांना आराम मिळालेला दिसतो.



# ऐन कामाच्या वेळी फोन नेटवर्कने धोका दिला?
## बदला ही सेटिंग, खराब नेटवर्कमध्येही करता येईल कॉल

**फोनमध्ये खराब नेटवर्क असल्यास कॉल करताना खूप त्रास होतो. महत्त्वाची कामंसुद्धा यामुळे रखडू शकतात. तुम्हालाही दररोज या समस्येचा सामना करावा लागत असेल, तर वाय-फाय कॉलिंग तुमची मदत करेल. या ट्रिकच्या मदतीने तुम्ही खराब नेटवर्कमध्येही स्पष्ट व्हॉइस कॉल करू शकाल. ही खास युक्ती ॲंड्रॉइड तसेच आयफोन युजर्ससाठी आहे. वाय-फाय कॉलिंगसाठी तुम्हाला वाय-फायमध्ये प्रवेश आवश्यक आहे. यानंतर फोनचे नेटवर्क खराब असले तरीही तुम्ही आरामात कॉल करू शकाल. ॲंड्रॉइड स्मार्टफोनवर वाय-फाय कॉलिंग कसे सुरू करावे ते पाहा.**

**गुगल पिक्सेल डिव्हाइसेस**

सर्वात आधी फोनच्या सेटिंगमध्ये जा. नेटवर्क आणि इंटरनेट पर्यायावर टॅप करा नंतर कॉल आणि एसएमएस पर्यायावर जा. वाय-फाय कॉलिंग पर्याय शोधा आणि उघडा. वाय-फाय कॉलिंग वापरण्यासाठी टॉगल चालू करा.

**वन प्लस युजर्स**

फोनच्या सेटिंग्जमध्ये दिलेल्या मोबाइल नेटवर्क पर्यायावर जाऊन सिम १ वर टॅप करा. नंतर वाय-फाय कॉलिंगचा पर्याय शोधा आणि उघडा. वाय-फाय कॉलिंग चालू करा. येथे तुम्ही उपलब्ध नेटवर्कमध्ये वाय-फाय आणि सेल्युलर कॉलिंगचे प्राधान्य देखील सेट करू शकता.



**आयफोनवर वाय-फाय कॉलिंग कसे सक्रिय करावे?**

सर्वप्रथम सेटिंगमध्ये दिलेल्या फोन ऑप्शनवर जा. नंतर वाय-फाय कॉलिंग पर्यायावर टॅप करा. वाय-फाय कॉलिंग चालू करण्यासाठी टॉगल चालू करा. जर वाय-फाय कॉलिंग सेवा उपलब्ध असेल, तर तुम्हाला स्क्रीनवर ऑपरेटरच्या नावापुढे वाय-फाय दिसेल.

**सॅमसंग आणि बहुतेक ॲंड्रॉइड डिव्हाइसेस**

प्रथम फोन ॲप उघडा. नंतर वरच्या उजव्या बाजूला दिलेल्या थ्री डॉट्सवर टॅप करा. सेटिंग्ज उघडण्यासाठी टॅप करा. येथे तुम्हाला वाय-फाय कॉलिंगचा पर्याय दिसेल. ते उघडा आणि टॉगल चालू करा.

# बर्फाच्या पाण्याचे सेवन करत असाल तर सावधान!

**उन्हाळ्यात** तहान भागवण्यासाठी आपण सगळेच थंड पाणी पितो अथवा बर्फ टाकून पाणी पितो, मात्र अधिक थंड पाणी प्यायल्यामुळे पचनास त्रास होतो. यामुळे आरोग्याशी संबंधित अनेक समस्या निर्माण होतात.

▮थंड पाण्यामुळे नसा आखडतात. यामुळे पचनाची क्रिया संथ होते आणि बद्धकोष्ठता, गॅस यासारख्या समस्या निर्माण होतात.

▮उन्हाळ्यात बाहेरचे तापमान अधिक असते. यात थंड पाणी प्यायल्यास छातीत कफ जमा होऊ लागतो. थंड पाणी प्यायल्यानंतर शरीराचे तापमान मेंटेन करण्यासाठी शरीराला मोठ्या प्रमाणात एनर्जी खर्च करावी लागते. याचा परिणाम पचन संस्थेवर होतो.



▮थंड पाण्यामुळे नसा संकुचित होतात. यामुळे हृदयाला ब्लड पंप करण्यासाठी जास्त मेहनत करावी लागते. यामुळे हार्ट बीट संथगतीने होतात.

▮थंड पाणी प्यायल्याने प्रतिकारक क्षमता कमी होते. यामुळे ॲलर्जी तसेच आजारांची भीती वाटते.

▮थंड पाणी प्यायल्याने शरीराचे तापमान अचानक बदलते. ज्याचा परिणाम डोकेदुखीसारख्या समस्या उद्‌भवतात.



# विरारमध्ये ३० वर्षे जुन्या इमारतीचा स्लॅब कोसळला

## “महापालिकेच्या दुर्लक्षितपणामुळेच दुर्घटना” - स्थानिकांचा आरोप

■ **बातमी /लेख, प्रीती दिपक नाईक**

वसई-विरार परिसरातील धोकादायक आणि जीर्ण इमारतींच्या स्लॅब कोसळण्याच्या घटना सातत्याने घडत असताना बुधवारी रात्री विरार (पश्चिम) येथील विराट नगर परिसरात पुन्हा अशीच एक गंभीर घटना घडली. रात्री सुमारे ८ वाजता आदिनाथ सोसायटी इमारतीचा काही भाग कोसळताच परिसरात भीती आणि गोंधळ निर्माण झाला.

**३० वर्षांची इमारत पूर्णपणे जीर्ण**

विराट नगरमधील 'आदिनाथ सोसायटी' ही सुमारे ३० वर्षे जुनी इमारत असून ती आता अत्यंत जीर्ण झाली आहे. बुधवारी रात्री अचानक स्लॅबचा भाग कोसळताच नागरिक घाबरून बाहेर पडले. माहिती मिळताच महानगरपालिकेच्या अग्निशामक दलासोबत बोळींज पोलीस घटनास्थळी दाखल झाले आणि संपूर्ण इमारत त्वरित रिकामी करण्यात आली.

**सुदैवाने जीवितहानी नाही; ६ महिन्यांपूर्वीच नोटीस**

या घटनेत कोणतीही जीवितहानी झाली नसल्याची माहिती समोर आली आहे. महापालिकेने सहा महिन्यांपूर्वीच ही इमारत ‘धोकादायक’ म्हणून घोषित करून नोटीस दिली होती. सुरक्षिततेच्या दृष्टीने रहिवाशांचे तत्काळ स्थलांतर करण्याचा निर्णयही महापालिकेने घेतला आहे.या वर्षात वसई-विरार शहरात धोकादायक, जुन्या इमारतींच्या स्लॅब कोसळण्याच्या अनेक घटना घडल्या आहेत. त्यात या नव्या घटनेमुळे नागरिकांमध्ये पुन्हा भीतीचं वातावरण निर्माण झालं आहे.

**“महापालिकेच्या दुर्लक्षितपणामुळेच दुर्घटना” - स्थानिकांचा आरोप**

नागरिकांचे म्हणणे आहे की शहरात अशा घटना वारंवार घडत असूनही महानगरपालिकेकडून योग्य तपासणी केली जात नाही. अनेक इमारतींना धोकादायक म्हणून नोटिसा दिल्या जातात, मात्र त्या इमारतींची प्रत्यक्ष दुरुस्ती झाली आहे की नाही, याची योग्य पाहणी होत नाही. पालिकेच्या या दुर्लक्षामुळेच अशा दुर्घटना घडत असल्याचा नागरिकांचा आरोप आहे.




# लाडक्या बहिणींना मोठा दिलासा!

## ई-केवायसी दुरुस्त करण्यास अंतिम संधी, 'या' तारखेपर्यंत चुका सुधारून घ्या...

पूर्वी ई-केवायसी प्रक्रियेत वडील किंवा पतीच्या आधार क्रमांकाचे ऑथेंटिकेशन (पडताळणी) करणे आवश्यक होते. यामुळे ज्या महिलांचे वडील किंवा पती हयात नाहीत, त्यांच्यासमोर ई-केवायसी कशी करावी, हा प्रश्न उभा राहिला होता. यावर तोडगा काढत महिला व बालविकास विभागाने आता नवीन सूचना जारी केल्या आहेत. ज्या महिलांचे वडील किंवा पती हयात नाहीत, त्यांनी त्यांच्या मृत्यू प्रमाणपत्राची प्रत अंगणवाडी सेविकांकडे ३१ डिसेंबरपर्यंत जमा करावी.

■ **मुंबई। प्रतिनिधी,**

महाराष्ट्र शासनाच्या महिला व बालविकास विभागाने 'मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना' अंतर्गत पात्र महिलांना दरमहा १५०० रुपये देण्याची योजना राबवली आहे.

या योजनेचा लाभ योग्य लाभार्थीपर्यंत पोहोचावा यासाठी सर्व महिलांना ई-केवायसी करणे बंधनकारक आहे. आता ई-केवायसीची अंतिम मुदत ३१ डिसेंबर २०२५ पर्यंत वाढवण्यात आली आहे. तसेच, ई-केवायसी करताना झालेल्या चुका दुरुस्त करण्याची एक संधीही महिला व बालविकास विभागाने दिली आहे. विशेषतः, वडील किंवा पती हयात नसलेल्या एकल महिलांसाठी ई-केवायसी प्रक्रिया कशी पूर्ण करावी, याबद्दलही सविस्तर सूचना देण्यात आल्या आहेत.

महिला व बालविकास मंत्री आदिती तटकरे यांनी दिलेल्या माहितीनुसार, आतापर्यंत १ कोटी ७४ लाख महिलांनी या योजनेची ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण केली आहे. ज्या महिलांकडून ई-केवायसी करताना काही चुका झाल्या असतील, त्यांना योजनेच्या वेब पोर्टलवर त्या दुरुस्त करण्याची अंतिम संधी मिळाली आहे. त्यामुळे, ज्या महिलांनी ई-केवायसी करताना चुका केल्या आहेत, त्यांनी आता काळजीपूर्वक माहिती भरून त्या दुरुस्त कराव्यात.

घटस्फोटित महिलांनी घटस्फोटाचे प्रमाणपत्र किंवा न्यायालयाच्या आदेशाची प्रत अंगणवाडी सेविकांकडे सादर करावी. ही प्रक्रिया ऑफलाईन पद्धतीने केली जाईल.

मात्र, या महिलांना स्वतःचा आधार क्रमांक पोर्टलवर नोंदवून स्वतःची ई-केवायसी प्रक्रिया पूर्ण करावी लागेल. या निर्णयामुळे अनेक एकल महिलांना योजनेचा लाभ मिळण्याचा मार्ग सुकर झाला आहे.

या योजनेचा उद्देश राज्यातील गरजू आणि पात्र महिलांना आर्थिक मदत करणे हा आहे. ई-केवायसीची मुदत वाढवल्याने आणि चुका दुरुस्त करण्याची संधी दिल्याने अधिक महिलांना या योजनेचा फायदा घेता येईल. या योजनेच्या माध्यमातून महिला सक्षमीकरणाला चालना देण्याचा शासनाचा प्रयत्न आहे.

# गोव्यातील नाईटी क्लबला आग, मुंबई अग्निशमन झाले सतर्क

■ **मुंबई। प्रतिनिधी,**

गोव्यात आगीची दुघर्टना घडताच मुंबई महापालिका प्रशासन आणि अग्निशमन दल सतर्क झाले असून नववर्ष २०२६ च्या स्वागतासाठी मुंबईतील अनेक हॉटेल्स्, आस्थापना, गृहसंकुल व इमारती, समुद्र किनाऱ्यावर व अन्य ठिकाणी कार्यक्रम, स्वागत सोहळयांच्या आयोजनाच्या पार्श्वभूमीवर ‘विशेष अग्निसुरक्षा मोहीम’ राबविण्यात येणार आहे.

नियमित होणाऱ्या अग्निसुरक्षा तपासणी व्यतिरिक्त मुंबई अग्निशमन दलाकडून ही विशेष मोहिम असेल.येत्या २२ डिसेंबर २०२५ ते दिनांक २८ डिसेंबर २०२५ या ७ दिवसांत करण्यात येणार आहे. दोन दिवसांपूर्वी गोव्यातील एका नाईट क्लबला आग लागून अनेक नागरिकांना प्राण गमवावे लागले. तर अनेक जण गंभीर जखमी झाले. या पार्श्वभूमीवर मुंबईतील विविध आव्हानांचा सामना करण्यासाठी अत्याधुनिक यंत्रणा, साहित्य आणि उपकरणांसह मुंबई अग्निशमन दल सज्ज आहे.

आगीच्या घटना घडू नये यासाठी व्यापक जनप्रबोधन केल्यास अशा दुर्घटना टाळता येऊ शकतात, यासाठी मुंबई अग्निशमन दल सतत प्रयत्न



शील असल्याचेही, अतिरिक्त आयुक्त डॉ. अश्विनी जोशी यांनी सांगितले.

अग्निशमन दलाच्या या विशेष मोहिमेत संबंधित आस्थापनांनी अग्निसुरक्षेबाबतच्या अटी व शर्ती यांचे पालन न केल्याचे आढळून आल्यास त्यांच्यावर महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीवसंरक्षक उपाययोजना अधिनियम २००६ च्या तरतुदींनुसार कारवाई केली जाणार आहे. मुंबई महानगरपालिका आयुक्त तथा प्रशासक भूषण गगराणी, अतिरिक्त आयुक्त (शहर) डॉ. अश्विनी जोशी यांच्या मार्गदर्शनाखाली ही ‘विशेष अग्निसुरक्षा मोहीम’ राबविण्यात येणार आहे.

# नशेत बोगस डॉक्टरने केलं ऑपरेशन

## 'युट्यूब' वर व्हिडिओ बघून केलं स्टोनचं ऑपरेशन

■ **नागपूर। प्रतिनिधी,**

क्लिनिक चालवणाऱ्या काका-पुतण्याच्या जोडीने एका महिलेवर प्राणघातक प्रयोग केला आहे. किडनी स्टोनने ग्रासलेल्या महिलेचं ऑपरेशन करण्यासाठी एका बोगस डॉक्टरांनी मोबाईलमध्ये 'युट्यूब' वर व्हिडिओ पाहिला आणि त्याच चुकीच्या पद्धतीने ऑपरेशन केलं. ऑपरेशन करताना डॉक्टरांनी चुकीची नस कापल्यानं महिलेचा दुर्दैवी अंत झाला. या घटनेनंतर पोलिसांनी कारवाई म्हणून क्लिनिकच सील केलं आहे, या प्रकरणाचा आरोपीने शोध सुरु केला आहे.

**बनावट डॉक्टरने २५ हजार उकळले**

पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, ही धक्कादायक घटना उत्तर प्रदेशातील बाराबंकी जिल्ह्यांतील कोठी पोलीस ठाण्याच्या हद्दीतील दफरापूर माजरा सैदानपूर गावात घडली आहे. किडनी स्टोनच्या त्रासाने तेह बहादूर रावत यांच्या पत्नी मुनीश्र रावत अगदी त्रस्त



होत्या. तेव्हा कुटुंबियांनी त्यांना रुग्णालयात नेले. त्याच ठिकाणी असलेल्या क्लिनिक चालक ज्ञान प्रकाश मिश्राने तपासाणीनंतर सांगितलं की, किडनी स्टोन आहे आणि तातडीने त्यांचं ऑपरेशन करावं लागणार आहे. एवढंच नाहीतर ऑपरेशनसाठी बनावट डॉक्टरने तब्बल २५ हजारांची मागणी केली होती.

या प्रकरणातून समोर आलं की, मुख्य आरोपी ज्ञान प्रकाश मिश्राचा पुतण्या विवेक कुमार मिश्रा हा रायबरेलीतील एका आयुर्वेदिक रुग्णालयात सरकारी कर्मचारी म्हणून कार्यरत आहे. त्याच्या नावाचाच वापर करून काका-पुतण्यांनी नको तेच कांड केलं आहे. आता रुग्णालयात सील केले असून आरोपी फरार झाल्याची माहिती समोर आली आहे.

**दारूच्या नशेत युट्यूब ओपन करून स्टोनचं ऑपरेशन**

याच प्रकरणात आता महिलेसोबत घडलेल्या धक्कादायक प्रकरणावरून पोलिसांकडे तक्रार दाखल करण्यात आली आहे. जेव्हा महिलेला ऑपरेशन थिएटरमध्ये नेलं असता, डॉक्टर ज्ञान प्रकाश मिश्रा हा दारूच्या नशेत होता, त्याने कसलंही ज्ञान घेतलं नव्हतं. त्याने मोबाईलवरील युट्यूब ओपन करून स्टोनचं ऑपरेशन कसं करावं याचा व्हिडिओ पाहिला आणि महिलेचं ऑपरेशन करण्यास सुरुवात केली. या अर्धवट ज्ञानामुळे आणि दारूच्या नशेत असलेल्या डॉक्टरांनी महिला रुग्णाच्या नसाच कापून टाकल्या. खूप रक्तस्राव आणि चुकीच्या उपचारामुळे दुसऱ्याच दिवशी महिलेचा दुर्दैवी अंत झाला.

# पक्षांत्तरावरून वाद, अमित शहांची भेट अन् पालिका निवडणुकीसाठी शिंदे-चव्हाणांमध्ये महत्त्वाची बैठक

■ **मुंबई। प्रतिनिधी,**

स्थानिक स्वराज्य संस्थांच्या निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजपामध्ये सध्या जोरदार इनकमिंग सुरू आहे. महत्त्वाचे म्हणजे या इनकमिंगच्या माध्यमातून शिवसेनेचे पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांना फोडले जात आहे. त्यामुळे काही दिवसांपूर्वी एकनाथ शिंदे यांनी या इनकमिंगची तक्रार करण्यासाठी केंद्रीय गृहमंत्री तथा भाजपाचे ज्येष्ठ नेते अमित शहा यांची भेट घेतल्याची चर्चा होती. यानंतर बुधवारी (१० डिसेंबर) मध्यरात्री भाजपाचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष रविंद्र चव्हाण यांनी अमित शहा यांची भेट घेतली. या भेटीनंतर आता रविंद्र चव्हाण आणि एकनाथ शिंदे यांच्यात पालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर महत्त्वाची बैठक होत आहे. रविंद्र चव्हाण यांनी अमित शहा यांची भेट घेतल्याने आगामी महापालिका निवडणूक आणि मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्यातील वादाच्या चर्चेच्या पार्श्वभूमीवर रविंद्र चव्हाणांचा दिल्ली दौरा आणि केंद्रीय नेत्यांच्या भेटीला महत्त्व प्राप्त झाले होते. अशातच अमित शहा यांच्या भेटीनंतर गुरुवारी (११ डिसेंबर) एकनाथ शिंदे आणि रविंद्र चव्हाण यांच्यात पालिका निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर एकत्र युती संदर्भात देवगिरी बंगल्यावर बैठक सुरू आहे. दोन्ही नेत्यांमध्ये रात्री नऊ वाजता बैठकीला सुरुवात झाली असून या बैठकीत मुंबई, ठाण्यासह राज्यातील काही महानगरपालिका निवडणुकीमध्ये शिवसेना आणि भाजपा एकत्र लढण्यासंदर्भात चर्चा होत असल्याची माहिती आहे. तसेच दोन्ही नेत्यांच्या बैठकीत नवी मुंबईबाबत काय चर्चा झाली आहे, याकडेही लक्ष लागले आहे.

**महापालिका निवडणूक घोषणेपूर्वीची भेट महत्त्वपूर्ण**

राज्य विधिमंडळाचे हिवाळी अधिवेशन नागपूर येथे सुरू आहे. त्यानंतर लवकरच मुंबई महापालिकेसह राज्यातील २९ महापालिका निवडणुकीची घोषणा होण्याची शक्यता आहे. याचपार्श्वभूमीवर भाजपाकडून संभाव्य उमेदवारांची यादी तयार करण्याचे काम सुरु आहे. त्यासोबतच मुंबई, ठाणे, कल्याण-डोंबिवली, नाशिक, पुणे, या महत्त्वाच्या महापालिकांमध्ये युती करायची की स्वतंत्र लढायचे, याची चर्चा या भेटीत झाली असण्याची शक्यता व्यक्त केली जात आहे.




# मुंबईतील सर्वात मोठया घरफोडीचा पर्दाफाश

## ना पुरावा, ना सीसीटीव्ही, फक्त...

■ **ठाणे। प्रतिनिधी,**

मुंबईतील मरीन ड्राईव्ह परिसरातून तब्बल ३.५६ कोटी रुपयांचे सोने-डायमंडचे दागिने चोरीला गेल्याच्या घटनेने खळबळ उडाली होती. या हायप्रोफाईल चोरीचा तब्बल ८ महिन्यांनी छडा लागला आहे. पोलिसांच्या अथक तपासानंतर ही चोरी कोणी केली, याची माहिती उघडकीस आली आहे. धक्कादायक बाब म्हणजे, घरात तात्पुरती काम करणाऱ्या मोलकरणीनेच हा लाखोंचा ऐवज लंपास केल्याचे समोर आले आहे. मरीन ड्राईव्ह पोलिसांनी या प्रकरणी आरोपी महिलेला कल्याणमधून अटक केली असून तिच्याकडून १ कोटी २७ लाख रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे.

**आरोपी सापडला**

यावेळी पोलीस पथकाने घरातील सर्व नोकर आणि संबंधित साक्षीदारांची कसून चौकशी केली. त्यांना मिळालेल्या माहितीचा आणि तांत्रिक पुराव्यांचा धागा पकडत पोलिसांनी हळू हळू तपास केला. अखेरीस, पोलिसांना अर्चना सुनिल साळवी (४४) या महिलेबद्दल माहिती मिळाली. ही महिला मे २०२५ मध्ये केवळ काही दिवसांसाठी फिर्यादींच्या आईची काळजी घेण्यासाठी तात्पुरती मोलकरीण म्हणून कामावर आली होती. पोलिसांनी अर्चना साळवी हिला ताब्यात घेऊन कसून चौकशी केली. त्यानंतर अर्चनाने या गुन्ह्याची कबुली दिली. फियार्दीच्या गैरहजेरीत आणि वृद्ध आई घरी असताना केवळ काही दिवसांसाठी कामावर आलेल्या या मोलकरणीने अत्यंत चलाखीने घरात प्रवेश मिळवला. त्याच काळात तिने कोट्यवधींचे दागिने चोरले आणि कोणालाही संशय येऊ न देता ती कामावरून निघून गेली. आठ महिने कोणालाही याचा थांगपत्ता लागला नाही. पोलिसांनी आरोपी अर्चना साळवीला अटक

# नांदेड जिल्हा परिषद शिक्षकाचा दारु पिऊन तुफान डान्स... प्रशासनाकडून निलंबनाची कारवाई

■ **नांदेड। प्रतिनिधी,**

नांदेड जिल्ह्यातील माहूर तालुक्यातील शेखापूर येथील जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत एका शिक्षकाच्या गैरवर्तनामुळे ग्रामस्थ आणि पालक संतप्त झाले आहेत. शाळेतील शिक्षक अनंत वर्मा यांनी दारूच्या नशेत विद्यार्थ्यांसमोर नाचत अश्लील भाषा वापरल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. हा संपूर्ण प्रकार एका पालकाने मोबाईलमध्ये रेकॉर्ड करून सोशल मीडियावर शेअर केला असून याबाबत सर्वांकडून संताप व्यक्त करण्यात येतोय. मिळालेल्या माहितीनुसार, अनंत वर्मा हे अनेक दिवसांपासून शाळेत मद्यप्राशन करून



येत असल्याची तक्रार विद्यार्थ्यांनी त्यांच्या पालकांकडे केली होती. मुलांच्या तक्रारीची खातरजमा करण्यासाठी काही पालकांनी अचानक शाळेला भेट दिली असता, शिक्षक वर्मा हे दारूच्या नशेत गावकऱ्यांसमोर नाचताना आढळले. केवळ तेवढेच नाही, तर विद्यार्थ्यांसमोर गैरशब्द वापरत असल्याचेही दिसून आले. या प्रकारामुळे पालक आणि ग्रामस्थांमध्ये तीव्र रोष निर्माण झाला. शेखापूर ग्रामस्थ आणि पालकांनी जिल्हा परिषदेच्या जलद कारवाईचे स्वागत केले असून, अशा घटनांवर कठोर पावले उचलली नाहीत तर विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेला आणि शिक्षणाला गंभीर धोका निर्माण होऊ शकतो, अशी भावना त्यांनी व्यक्त केली आहे.

शिक्षकांच्या अशा वर्तनामुळे विद्यार्थ्यांच्या भविष्यावर गंभीर परिणाम होऊ शकतो, असा सवाल पालकांनी उपस्थित केला. “ज्यांच्या हातात मुलांचं शिक्षण आहे, तेच शिक्षक असे वागत असतील तर मुलांनी काय शिकायचं?” असा प्रश्न उपस्थित करत त्यांनी तातडीने कारवाईची मागणी केली. त्यानंतर हा सर्व प्रकार जिल्हा परिषद शिक्षण विभागाच्या निदर्शनास आणून देण्यात आला. व्हायरल व्हिडिओ आणि पालकांच्या तक्रारीची दखल घेत शिक्षण विभागाने तत्काळ चौकशी सुरू केली. प्राथमिक चौकशीत आरोपांची खातरजमा झाल्यानंतर शिक्षक अनंत वर्मा यांना निलंबित करण्यात आल्याची माहिती अधिकाऱ्यांनी दिली. शाळेतील शैक्षणिक वातावरण बिघडू नये म्हणून गटशिक्षण अधिकाऱ्यांनी तातडीने दुसऱ्या शिक्षकांची नेमणूक करून शाळेचे कामकाज सुरळीत सुरू केले आहे. पुढील चौकशीदरम्यान संबंधित शिक्षकावर कठोर शिस्तभंगाची कार्यवाही केली जाईल, अशी माहिती जिल्हा परिषद शिक्षण विभागाने दिली.

# कारमध्ये रोमान्स करताना हजारो जोडप्यांचे अश्लील व्हिडीओ केले रेकॉर्ड, एक्सप्रेस वे कांडची संपूर्ण कहाणी


■ **मुंबई। प्रतिनिधी,**

उत्तर प्रदेशातील सुल्तानपूर येथील पूर्वांचल एक्स्प्रेस वेवरील हलियापूर टोल प्लाझाच्या कर्मचाऱ्यांच्या घाणेरड्या कृत्यामुळे प्रवाशांच्या सुरक्षिततेवर प्रश्न उपस्थित होत आहेत. आरोपी कर्मचाऱ्यांनी हायवेवरील हायटेक सीसीटीव्ही कॅमेऱ्यांचा वापर करून जोडप्यांचे त्यांच्या कारमधील अश्लील आणि प्रायव्हेट व्हिडीओ रेकॉर्ड केले. या प्रकरणाने सर्वत्र एकच खळबळ उडाली.

२५ ऑक्टोबर रोजी आझमगडहून लखनऊला जाताना एका नवविवाहित जोडप्याचे कारमधील खाजगी क्षण असलेलं सीसीटीव्ही फुटेज व्हायरल झाल्यानंतर हे धक्कादायक प्रकरण उघडकीस आलं. २ डिसेंबर रोजी मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ, सुल्तानपूर जिल्हा दंडाधिकारी आणि पोलिस अधीक्षकांना या प्रकरणाबाबत पत्र लिहिण्यात आलं. आरोपींनी पीडित जोडप्याला ३२,००० रुपयांसाठी ब्लॅकमेल केल्याचा देखील आरोप आहे. मात्र, पैसे देऊन पीडितांचे व्हिडिओ देखील व्हायरल करण्यात आला.

**आरोपीचा खळबळजनक जबाब**

पोलिसांच्या चौकशीदरम्यान आरोपी म्हणाला की, ज्या कर्मचाऱ्यांनी पूर्वी कामावरून काढून टाकण्यात आलं, त्यांनीच



हे कृत्य केलंय. आरोपी म्हणाला की, पूर्वी ज्या कर्मचाऱ्यांना टोल प्लाझावरून काढून टाकण्यात आले होतं त्यांनी धमकी दिली होती की जर ते इथे काम करू शकत नसतील तर जे कर्मचारी इथे काम करत आहेत, त्यांनाही ते काम करू देणार नाही. आरोपीने म्हटलं की, ज्या कर्मचाऱ्यांना काढून टाकण्यात आलं ते वेळेवर काम न करणारे आणि कामात निष्काळजीपणा करणारे होते. त्यांच्याविरुद्ध तक्रारी दाखल केल्या गेल्या आणि त्यांच्यावर कारवाई करण्यात आली तेव्हा ते अतिशय संतापले.

**आरोपीने नेमकं काय सांगितलं?**

आरोपीने स्पष्ट केलं की, असे व्हिडिओ गेल्या अडीच वर्षांपासून रेकॉर्ड केले जात होते. या काळात तब्बल हजारो जोडप्यांचे अश्लील व्हिडिओ रेकॉर्ड केले गेले. मात्र, त्यापैकी एकही व्हिडिओ व्हायरल झालेला नाही. व्हायरल झालेला व्हिडिओ आधीच्या एका कर्मचाऱ्याने त्याच्या ड्रायव्हरला दिला होता. त्याला खात्री होती की ड्रायव्हर व्हिडिओ व्हायरल करणार नाही, परंतु त्याने ते चुकीचं कृत्य केलं.

अँटी-ट्रॅफिक मॅनेजमेंट सिस्टम (एटीएमएस) चं काम पाहणाऱ्या वेंडर कंपनीने आशुतोष सरकार, सिस्टम टेक्निशियन आशुतोष तिवारी, ट्रॅफिक मॅनेजर शशांक शेखर आणि सिस्टिम इंजिनिअर प्रमोद कुमार यांना कामावरून काढून टाकले आहे. या चौघांवरही गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलिसांनी तिघांना तुरुंगातही पाठवलं आहे. या प्रकरणात सहभागी असलेला शशांक शेखर फरार असून त्याचा शोध सुरू असल्याची माहिती आहे.

**हजारो कपल्सचे व्हिडीओ रेकॉर्ड...**

या प्रकरणातील आरोपी मॅनेजर आशुतोष सरकारला पोलिसांनी अटक केल्याची माहिती आहे. चौकशीदरम्यान, आरोपी आशुतोषने केलेल्या विधानामुळे सर्वांनाच मोठा धक्का बसला आहे. यापूर्वी, अशा पद्धतीने हजारो कपल्सचे व्हिडीओ रेकॉर्ड करण्यात आल्याचा आशुतोषने खळबळजनक खुलासा केला.

हे दैनिक मालक, मुद्रक, प्रकाशक व संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक यांनी सोमाणी प्रिंटींग प्रेस, कार्यालय - गाला नं. ४, एन. के. इंडस्ट्रीयल इस्टेट, प्रवासी इंडस्ट्रीयल इस्टेटच्या बाजुला, गेट नं. २, गोरेगाव (पुर्व) मुंबई ४०००६३ (महाराष्ट्र) , येथे छापून रुम नं. १०३, कुणाल कुटीर बी बिल्डींग, नवघर रोड, हनुमान मदिराजवळ, भाईंदर (पुर्व), जि. ठाणे ४०११०५ (महाराष्ट्र) येथे प्रसिद्ध केले. संपादक - डॉ. श्री. दिपक मोरेश्वर नाईक, पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जवाबदारी यांची राहील, सर्व वाद आणि दावे ठाणे न्यायालयीन कक्षेच्या आधील राहतील. (या वर्तमानपत्रात प्रसिद्ध होणाऱ्या बातम्या /लेख / जाहिराती यांची जवाबदारी संबधीत वार्ताहर, लेखक, आणि जाहिरात प्रतिनिधी याच्यावर राहील.) भ्रमणध्वनी - ७४००००१४७४. Email : marathiekikaran2021 @gmail.com

Printed , Published and Owned by **Dr. Mr. Deepak Moreshwar Naik**. Printed at **SOMANI PRINTING PRESS**, OFFICE - Gala No. 4, Near N.K. Industrial Estate, Near Pravasi IndustrialEstate, Gate No.2, Goregaon (E), Mumbai 400 063, Maharashtra, Published at Room No. 103, Kunal Kutir, B Building , Navghar Road, Near Hanuman Mandir, Bhayander (East ) Dist - Thane, PinCode 401 105, Maharashtra. Editor : Dr. Mr. Deepak Moreshwar Naik, Mo.7400001474, Email Id : marathiekikaran2021@gmail.com